

१९५७
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. नं. ७७८

REFBK-0009479

म. श्री. दीक्षित

# सत्तावनचे सप्तर्षी....

ग्रंथ संग्रहालय, ठाणे शिक्षक
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ....८४७८.... नों: दि: ...
REFBK-0009479
८४७८

: लेखक :
म. श्री. दीक्षित

मूल्य
१।·
रुपया

इनामदार बन्धु
प्रकाशन, पुणें २

प्रकाशक :
बा. शा. इनामदार
इनामदार बन्धु
९९१ सदाशिव, पुणें २

प्रथमावृत्ति
अक्षय्यतृतीया
शके १८७९

पुढील सर्व हक्क
लेखकाधीन

मुद्रक :
मा. प. तळेकर
श्रीदत्त मुद्रणालय
३३५ शनवार, पुणें २.

डॉ. शं. दा. पेंडसे
आणि
प्रा. भ. श्री. पंडित
यांस—

## : अंतरंग :


- ऋणनिर्देश
- मंगल पांडे
- बहादुरशहा
- नानासाहेब
- अजिमुल्लाखान
- राणी लक्ष्मीबाई
- कुंवरसिंह
- नरगुंदकर
- तात्या टोपे
- सत्तावनचा
  कालपट

स्वातंत्र्यपूर्वकाळांतील क्रांतिप्रयत्नांची ओळख करून घेऊन नवागत स्वातंत्र्यास अभिवादन करा !

## ही पुस्तकें आपल्या संग्रहास नसल्यास आजच मागवा

**स्वातंत्र्यवीरांचें सागरदिव्य :** लेखक—डॉ. ल. शं. भावे, किं. १ रु.
या खंडकाव्याचे नायक स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे आहेत. आधुनिक भारताच्या स्वातंत्र्ययुद्धांत वीर सावरकरांचें व्यक्ति व कार्य अत्यंत श्रेष्ठ असें आहे. त्यांच्या अद्भुत जीवनाचें काव्यमय वर्णन अत्यंत रसाळ आणि प्रासादयुक्त वाणीनें या पुस्तकांत वर्णिलें असून प्रा. रा. ब. आठवले यांची विवेचक प्रस्तावना या पुस्तकास जोडली आहे.

**माझी जन्मठेप :** वि. दा. सावरकर, पृष्ठें ५३४, मूल्य आठ रुपये,
सवलतीची किंमत पांच रुपये
वीररसानें आमूलाग्र ओथंबलेली एक अद्भुतरम्य आणि रोमहर्षक कादंबरी. भारतीय जीवनाचें आणि वाङ्मयाचें एक अमर भूषण.—**आचार्य अत्रे**
भीषण, अद्भुत व रोमांचक, आत्मचरित्रांचा मेरुमणि. **—वनहट्टी**

**पेशवाईतील रत्नें :** लेखक—म. श्री. दीक्षित, किं. १ रुपया.
उत्तर पेशवाईत अनेक कर्तृत्ववान् व महत्त्वाकांक्षी व्यक्ति होऊन गेल्या. देशाच्या दृष्टीनें त्यांचें शौर्य कारणीं लागलें नसेल; पण त्यांच्याहि जीवनांत कांहीं परमोच्च गुण होते. त्या त्यांच्या गुणदोषांचें व्यक्तिचित्रण देशाचें भवितव्य उज्ज्वल करूं पाहणाऱ्या विद्यार्थ्यांस मार्गदर्शक ठरेल.

**ब्रिटीश साम्राज्याचा अधःपात :** लेखक—न. चिं. केळकर, किं. ३ रु.
ब्रिटिशांचें जोखड हिंदुस्थानचे मानेवरून कधींच नाहींसें होणार नाहीं असें समजणारा एक फार मोठा वर्ग होता. परंतु कांहीं राजकारणी भविष्यवाद्यांनीं ब्रिटिशांना येथून केव्हांना केव्हां तरी काळें करावें लागणार हें ओळखले होतें. साहित्यसम्राट् केळकरांनीं १९३९ ते १९४७ या आठ वर्षांतील कालखंडांत लिहिलेले हे लेख आजहि वाचले असतां त्यांच्या दूरदृष्टीपणाची साक्ष प्रत्ययास येते.

**इनामदार बन्धु, ९९१ सदाशिव पुणें २.**

विद्यार्थ्यांनो ! !

## हीं पुस्तकें वाचा ! ! !

### ★ साहसी सत्यकथा

लेखक : भा. द. खेर
किंमत १ रुपया

साहसविषयक वाङ्मयाची मराठींत उणीव आहे आणि म्हणूनच साहसप्रिय तरुण विद्यार्थी वाचकांना या साहसी सत्यकथा वाचून जीवनाची एक निराळी अननुभूति प्रत्ययास येईल.

### ★ युद्धकालीन कथा

लेखक : भा. द. खेर
किंमत १ रुपया

' युद्धस्य कथा रम्या ' ही उक्ति प्रसिद्ध आहे. कपोल-कल्पित कथेपेक्षां सत्यकथांची आवड हल्लीं वाढूं लागली आहे. आणि म्हणूनच सत्याची बैठक असलेल्या या कथांना एक प्रकारची अवीट गोडी निर्माण झाली आहे.

### ★ आषाढी कार्तिकी

लेखक : भा. द. खेर
किंमत १॥ रुपया

महाराष्ट्र ही संतांची पावनभूमि आहे. ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ व तुकाराम या चार संतांनीं अध्यात्म व भक्ति यांचा अमोल ठेवा आपणांस देऊन ठेवला आहे. त्यांच्या कार्याचें महत्त्व हें पुस्तक आपणांस उलगडून सांगेल.

### ★ ओवाळणी

लेखक : लखजी अंबराईकर
किंमत १ रुपया

प्रत्येक देशांत अनेक तेजस्वी क्रांतिकारक व देशभक्त होऊन गेले. त्यांच्या कार्याची उदात्तता उलगडून दाखविल्यास त्यांच्या जीवितकार्याचें स्वरूप समजून येतें. यासाठीं या कथा एकदां अवश्य वाचा.

इनामदार बन्धु, ९९१ सदाशिव, पुणें २.

ग्रंथालय, ठाणे,
अनुक्रमांक ........ दिः ....
क्रमांक ........................ नोंः दिः .... ....

# ऋणनिर्देश

१८५७ च्या शताब्दि उत्सवानिमित्त 'सत्तावनचे सप्तर्षी' हें माझें दुसरें पुस्तक प्रसिद्ध होत आहे. सत्तावनच्या क्रांतियुद्धांतील आठ वीरांचीं चरित्रें पुस्तकांत समाविष्ट आहेत. चरित्रें शक्यतों इतिहासाशीं इमान राखून लिहिली आहेत. भाषेचा चटकदारपणा जेवढा आणतां येईल तेवढा आणला आहे व सर्वसामान्य वाचकाला व विद्यार्थीवर्गाला अपरिचित असणारी माहितीहि भरपूर देण्याचा यत्न केला आहे. चरित्रांची मांडणी व लेखन अशा पद्धतीनें केलें आहे कीं, पुस्तक वाचून झाल्यावर सत्तावनचें एक सुसूत्र चित्रच वाचकांसमोर उभें राहावें. पुस्तकाच्या शेवटीं सत्तावनविषयक विस्तृत कालपट दिला आहे. या कालपटांतील क्रांतियुद्धाची पार्श्वभूमि व प्रत्यक्ष युद्धांतील ठळक घडामोडी ध्यानांत घेतल्या म्हणजे वाचकांना सत्तावनचें स्वरूप किती उग्र व व्यापक होतें तें कळून येईल.

पुस्तकाचें नामकरण करण्यापूर्वीं मी कांहीं रसिक व विद्वान् मंडळींशीं चर्चा केली होती. या मंडळींपैकीं कुणालाहि नांव खटकलें नाहीं. उलट बहुतेकांनीं नांवाविषयीं प्रशंसाच केली. 'सप्तर्षी' त आठ चरित्रें कशीं अशी शंका कित्येकांना येईल. 'सप्तर्षी' त एकूण आठ लहानमोठे तारे असतात. आठवी अरुंधति आहे. आपले प्राचीन सप्तर्षी तेजस्वी होते, व आपल्या उज्ज्वल कर्तृत्वामुळें ते अमर झाले आहेत. 'सत्तावनचे सप्तर्षी' एका विशिष्टार्थानें ऋषीच नव्हेत का? तेजस्विता व अमरत्व या दोन बाबतींत प्राचीन ऋषींशीं त्यांची सहज तुलना होऊं शकते. या सप्तर्षींचे भारतीय जनतेवर फार मोठें ऋण आहे. त्यांचें ऋण फेडण्याचा एक अल्पसा प्रयत्न या दृष्टीने मी माझें पुस्तक लिहिलें व तें आतां वाचकांचे हातीं देताना-मनाला कर्तव्यपूर्तीचें एक अपूर्व समाधान लाभत आहे; सत्तावनच्या क्रांतियुद्धांत किमान एक लाख भारतीय जनता धारातीर्थीं पडली. त्यांच्या जीवनाचें खरोखर सोनें झालें. आपला देश आज स्वतंत्र झाला आहे. पण भारतीय स्वातंत्र्याचें पहिलें स्तोत्र १८५७ च्या वीरांनी गाईलें आहे

व तेहि हातीं खड्ग घेऊन व शत्रूचें रक्त सांडून. सत्तावनच्या आंदोलनाचें मूल्य मापन केवळ कागदी कागदपत्रांनीच करण्यासारखें नाहीं. त्याला कांहीं अन्य कसोट्या आहेत. पराभूत झाले म्हणजे 'बंडखोर' व विजयी झाले म्हणजे 'बहादूर' असल्या कल्पनांतूनच 'बंडखोर' विचारसरणी फैलावते ! आपलें स्वतंत्र सार्वभौम प्रजासत्ताक, सत्तावनच्या शताब्दि-उत्सव साजरा करणार आहे ही एकच गोष्ट 'स्वातंत्र्य–समरा' ची ग्वाही देण्यास पुरेशी आहे.

'सत्तावनच्या सप्तर्षी' ना प्रकाशांत आणण्यांत अनेकांचा ऋणभार आहे. ज्या अनेक इंग्रजी-मराठी ग्रंथांचा मला उपयोग झाला त्यांच्या कर्त्यांचें, विशेषतः वीर सावरकरांचें ऋण सर्वांत मोठें आहे. श्री. बाबुराव इनामदार यांनीं प्रकाशन अंगावर घेतलें नसतें तर पुस्तक लिहिण्याचा खटाटोप मी केला नसता. इकडे तिकडे चारदोन लेख लिहिले असते इतकेच. याशिवाय अनेक रसिक व विद्वान् हितचिंतकांचें सत्तावनच्या अभ्यासांत नानाप्रकारचें साहाय्य झालें. वरील सर्वांचा मी ऋणी आहे.

२२६ सदाशिव, पुणें २
अक्षय्य ३, शके १८७९

म. श्री. दीक्षित

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २८७९



# मंगल पांडे

मंगल पांडे हा १८५७ च्या क्रांतियुद्धांतील पहिला हुतात्मा होय. क्रांतियुद्ध ज्या अनेक कारणांमुळें झालें त्यांपैकीं हिंदी फौजांचा असंतोष हें प्रमुख कारण समजलें जातें. क्रांतियुद्ध संपेपर्यंत हिंदुस्थानांत त्या वेळीं ईस्ट इंडिया कंपनीचें राज्य होतें. कंपनी सरकारविरुद्ध हिंदी फौजांच्या अनेक तक्रारी होत्या. लढाईसाठीं हिंदुस्थानबाहेर पाठवूं नये, पगार जास्त द्यावेत, बढत्या मिळाव्यात अशा स्वरूपाच्या या तक्रारी होत्या; पण याहीपेक्षां महत्त्वाची व गंभीर स्वरूपाची तक्रार होती ती म्हणजे धर्मभावना दुखावण्याची. बंगाल आर्मीतील हिंदुमुसलमान शिपायांना मोठी काळजी पडली होती कीं, गोरे लोक आपल्याला बाटवून ख्रिस्ती करणार. ख्रिस्ती धर्माचा प्रचार त्या वेळीं पाद्री लोक सर्वत्र करीत असत. गोरगरीब रयतेला व भावड्या शिपायांना नोकरीधंद्याचें व पैशाचें आमिष दाखवून त्यांनीं सर्रास बाटवाबाटवीचे प्रकार चालविले होते. हिंदी फौजेंतील शिपायांच्या कानांवर हे

प्रकार अधूनमधून येत व त्यामुळें ते सरकारवर नाराज असत. त्यांची ही नाराजी वाढण्याला खुद्द फौजेंतच एक नवी घटना घडली. सरकारनें जुन्या ब्राउनबेस बंदुकांऐवजीं नव्या एनफील्ड रायफली फौजांना वापरण्यास दिल्या होत्या. या रायफलींचीं काडतुसें हातानें किंवा दांतांनीं सोलावीं लागत. काडतुसांना गाईची किंवा डुकराची चरबी लावलेली असते अशा अफवा पसरल्या असल्यामुळें या नव्या रायफली वापरायच्या नाहींत असा शिपायांनीं निश्चय केला. गाईची व डुकराची चरबी माखलेलीं काडतुसें तोडायला लावून कंपनी सरकार आपला धर्म बुडविणार अशी खात्री पटतांच बंगाल आर्मींतील हिंदुमुसलमान एकदम बिथरले व त्यांनीं बंडाचा झेंडा उभारला.

कलकत्त्याजवळ बराकपूर येथें १९ वी व ३४ वी अशा दोन पलटणी १८५७ सालीं होत्या. या दोन्ही पलटणी धर्मभावना दुखविल्यानें असंतुष्ट होऊन बंडाला अधीर झाल्या होत्या. १९ व्या पलटणीनें तर नवीं काडतुसें वापरण्यास साफ नकार दिला. इंग्रज अधिकाऱ्यांना ही गोष्ट समजतांच त्यांनीं १९ वी पलटणच रद्द करण्याचा निर्णय केला व त्या पलटणीला जरब बसविण्यासाठीं मार्च महिन्यांत ब्रह्मदेशांतून गोऱ्यांची ८४ वी पलटण आणविली. पलटण रद्द केल्यानें आपल्यावर बेकारीचा प्रसंग ओढवणार या कल्पनेनें शिपाई आणखीनच चवताळले. इंग्रजांना खाऊं कीं गिळूं असें त्यांना झालें आणि एके दिवशीं एक उत्तर हिंदुस्थानी ब्राह्मण शिपाई जिवावर उदार होऊन खरोखरच इंग्रजांच्या जिवावर उठला.

२९ मार्च १८५७ ला बराकपूर छावणींत एक अद्भुत व रोमांचकारी समरप्रसंग घडला. या दिवशीं रविवार होता. गोरे अधिकारी आपापल्या बंगल्यांत स्वस्थपणें विश्रांति घेत पडले होते. हिंदी लाइनींतला एक शिपाई मात्र भांगेचा लोटा गट्ट करून आपल्या खाटेवर मस्त होऊन पडला होता. त्याला कसली बरं मस्ती चढली होती ? त्याच्या डोळ्यांवर कसली बरं धुंदी चढली होती ? कोणत्या विचारांत हा अवखळ शिपाई मग्न झाला

मंगल पांडे अनुक्रम वि: ११
क्रमांक ........................ नों: दि: ..........

होता ? त्याच्या डोक्यांत कोणते विचार थैमान घालीत होते ? कोणती ज्योत त्याच्या अंतःकरणांत पेटली होती ? मंगल पांड्यावर भांगेचा अंमल चढला होता तर ! होय. भांगेचा अंमल ! पण त्या अंमलांतच इंग्रजी अंमल खतम् करण्याच्या निश्चयानें तो इंग्रज अंमलदारावर चालून गेला—!

पांड्यानें कपडे चढवले, एका हातांत नागवी तलवार घेतली, दुसऱ्या हातीं बंदूक घेतली आणि 'जय शंकर—जय भोलानाथ' अशी आरोळी ठोकून तो ओरडत ओरडत व धावतपळत घरांतून जो बाहेर पडला तो कवाइतीच्या मैदानाकडे निघाला. पांडे इतर शिपायांना हांका मारून मोठमोठ्यानें ओरडत सुटला कीं, 'या, बंधूंनो या – लवकर बाहेर या. उठा – पहातां काय ? आज काडतुसं वापरूं नका. आपल्या धर्मावर घाला घालणाऱ्या फिरंग्यांना ठार मारा !' धांवतां धांवतां वाटेंत त्याला एक बिगुलवाला दिसला. 'बिगुल वाजवून सर्वांना बोलाव' असें पांड्यानें त्याला सांगितलें; पण बिगुलवाला घाबरून निघून गेला. पांडेच्या आरोळ्या ऐकून हळूहळू शिपाई बाहेर आले व पांडे काय करतो आहे तिकडे आ वासून बघूं लागले. इतक्यांत पांडेच्या क्रुद्ध नजरेला एक गोरा अधिकारी दिसला. तत्काळ पांडेने त्याच्या रोखानें गोळी झाडली ; पण नेम चुकला. पलटणींतील सारे शिपाई खदखदां हंसून हा तमाशा लांबून बघत होते. चवताळलेल्या पांडेला धरण्यास कोणी धजावेना. एक हवालदार मात्र भयभीत होऊन धांवत धांवत अधिकाऱ्यांकडे गेला व 'पांडे भ्रमिष्ट होऊन गोऱ्यांना मारीत सुटला आहे' अशी त्यानें वर्दी दिली. अधिकाऱ्यांचा प्रथम या गोष्टीवर विश्वासच बसेना; पण बाहेरील जमाव पाहून व गलका ऐकून त्यांना खात्री पटली व मग ले. बग व सार्जंट मेजर हडसन् पिस्तुलं घेऊन कवाइतीच्या मैदानाकडे धांवले.

घोड्यांवर बसून दोघे गोरे अधिकारी आपल्या रोखानें येत आहेत हें दिसतांच पांडे झटकन् जवळच्या एका तोफेआड लपला व तोफेआडून नेम धरून

त्यानें बगवर गोळी झाडली. गोळी बगला न लागतां त्याच्या घोड्याला लागली व घोड्यासह बग मैदानावर आदळला. पांडे त्वरा करून दुसरी गोळी झाडणार तोंच बगनें चपळाईनें त्याच्यावर गोळी झाडली. दोघांचेहि नेम चुकले. बग लगेच तलवार उपसून पांड्यावर धांवून गेला. हडसनहि त्याच्या मदतीला धांवला. दोघां गोऱ्यांबरोबर पांडे आतां तलवारीचे हात फिरवूं लागला. पांडे शरीरानें 'भला खबरदार' माणूस होता व तलवार फिरविण्यांतहि पटाईत होता. किती तरी वेळ या गोऱ्या दुकलीबरोबर त्याची झटापट चालू होती. तरवारी खणखण वाजत होत्या. पांडेचे कपडे रक्तानें माखले होते. गोरेसाहेब जखमांनीं विव्हळत पण लढत होते. कोणी थकेना कीं हटेना. पांडे दोघांना पुरून उरला. सभोंवतीं ४०० शिपाई हें द्वंद्वयुद्ध बघत उभे होते व टाळ्या पिटून पांडेला उत्तेजन देत होते. त्यांच्यापैकीं पांडेला आवरायला एकहि पुढें होईना. सर्वजण आनंदांत होते कीं, पांड्याच्या तलवारीला गोरेसाहेब आतां बळी पडणार—

पण गोऱ्यांऐवजीं काळ्याचाच बळी जाण्याचा योग होता. गोऱ्यांच्या सुदैवानें ग्रेनेडियर पलटणींतील शेख पलटू हा मुसलमान शिपाई एकदम पुढें आला व त्यानें पांड्याचा हात पाठीमागून घट्ट पकडला. पांड्यानें त्याच्यावरहि एक वार केला. तेवढ्यांत दोघे गोरे अधिकारी जीव बचावून पळून गेले. ते पळून जातांच भोंवतीं जमलेल्या शिपायांनीं पांड्याचा जयजयकार केला व शेख पलटूच्या हातून त्याची सुटका केली. पांडे दमला होता. रणांगणावरील पहिल्या फेरींत विजयश्रीनें त्याला माळ घातली होती; पण त्याची ही विजयश्री अल्पकाळच टिकली.

छावणीचा मुख्य अधिकारी जनरल हियरसी याला जेव्हां पांडेनें मांडलेला अनावर धुमाकूळ कळला तेव्हां तो लष्करी पोषाख करून आपल्या दोन मुलांसह त्वेषानें मैदानावर दाखल झाला. तिघांच्या हातांत भरलेलीं पिस्तुलें होतीं व तिघेहि घोड्यांवर होते. 'कुठें आहे तो मंगल पांड्या?

ओ, यू डॅम रास्कल्स्–व्हेअर इज दॅट मॅड डॉग ?' जनरलनें गर्जना केली. 'तो पहा, तो पहा' कुणी तरी हात दाखवून अवलक्षण केलें आणि मग हियरसीनें पांड्याच्या रोखानें घोडा वळवला. गोऱ्या साहेबांची भंवेरी बघत इतका वेळ उभे असलेले शेंकडों शिपाई आतां भयभीत झाले. साहेबाच्या मदतीला जावें कीं जाऊं नये ? पांडे मेला तर ? साहेबाला वांचवलं तर ? जावं का साहेबाच्या मदतीला ?

साहेबानें मात्र कुणाचीच वाट पाहिली नाहीं. वंदूक सरसावून पांडे उभा होता. पांड्याच्या रोखानें घोडा फेकण्यापूर्वी हियरसीनें आपल्या मुलाला बजावून ठेवलें कीं, 'बेटा जॉन, पांड्याचा तर मी आतां निकाल लावतोंच; पण जर यदाकदाचित् मीच बळी पडलों तर माझ्या मरणाचा सूड घे !' आणि लगेच तिन्ही घोडे उधळले व पांड्यावर चाल करून गेले. कांहीं भ्याड हिंदी शिपाईहि साहेबांच्या मदतीला धांवले. हा सारा नामुष्कीचा प्रकार पाहून दमला-भागलेला पांडे वावरून गेला. त्याला काय वाटलें कुणास ठाऊक, साहेबांवर रोखलेली वंदूक त्यानें निमिषार्धांत स्वतःच्या छातीवर उडवून घेतली. तिघे साहेब त्याच्या जवळ जाऊन पहा-तात तों काय, पांडे रक्तबंबाळ अवस्थेंत बेशुद्ध होऊन भूमातेच्या मांडीवर पडला आहे. मागून आलेल्या हिंदी शिपायांनीं साहेबाच्या हुकुमावरून त्याला लगेच उचललें व छावणीच्या हॉस्पिटलमध्यें नेलें.

घायाळ पांडेवर औषधोपचार करण्यांत आले. पांडे हळूहळू शुद्धीवर आला. इतकेंच नव्हे तर चांगला बरा झाला. पांडे मरणाच्या दारांतून परत आला. कशासाठीं ? तर वीरमरण पत्करण्यासाठीं ! वधस्तंभाला कवटाळण्यासाठीं ! हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं ! आहुती देण्यासाठीं ! हौतात्म्य पत्करण्यासाठीं !

लौकरच लष्करी कोर्ट भरून मंगल पांडेची चौकशी सुरू झाली. दमदाटी व मारहाण करून त्याला वारंवार विचारण्यांत येई कीं, 'बोल, तुझ्याबरोबर कटांत आणखी कोण होते ?' पण या दमदाटीला व मारहाणीला पांडेनें

मुळींच भीक घातली नाहीं. इंग्रजांच्या फैरींना त्याचें एकच ठाम उत्तर असे, 'आणखी कुणी नाहीं. मी एकट्यानेंच हें कृत्य केलें !' आरोपीला शिक्षा कोणती द्यायची हें ठरलेलेंच होतें. पांडेनें केलेल्या लष्करी गुन्ह्याबद्दल, बंडखोरीबद्दल व राजद्रोहाबद्दल त्याला फांशीची शिक्षा सुनावण्यांत आली ! ८ एप्रिल १८५७ रोजीं सकाळीं ८ वाजतां तळ्याच्या कांठीं उभारलेल्या वधस्तंभाकडे मंगल पांडेला नेण्यांत आलें. फांशी देण्यासाठीं कलकत्त्याहून चार मांग बोलावण्यांत आले होते. त्यांच्या करवीं पांडेला लगेच फांशी देण्यांत आलें. गळफांस आवळला जातांच पांडेच्या अंतःकरणांतील स्वातंत्र्याची मंगल ज्योत विझून गेली !

मंगल पांडे ज्या पलटणींत होता ती १९ वी पलटण ३१ मार्चला रद्द करण्यांत आली व ३४ व्या 'बच्या' पलटणीनें पश्चात्ताप व्यक्त केल्यामुळें तिला दया दाखविण्यांत आली. शेख पलटूनें गाजविलेल्या 'पराक्रमा' बद्दल त्याला हवालदार करण्यांत आलें. मंगल पांडे मात्र आपल्या अमोल जिवानिशीं अमर झाला !! 'क्रांतियुद्धाची पहिली चकमक ही येथें झडली नी अशा रीतीनें हा पहिला हुतात्मा स्वर्गवासी झाला. ज्याचें रक्त हें हौतात्म्याच्या महानदीचें उगमस्थान होऊन राहिलें आहे त्या मंगल पांडेच्या मंगल नामाची स्मृति आपण अभिमानपूर्वक आपल्या अंतःकरणांत सदैव सांठवून ठेविली पाहिजे. प्रत्येक मातेनें अत्यंत अभिमानपूर्वक या हुतवीराची यशःकथा आपल्या मुलांना सकौतुक समजावून द्यावी !'

मंगल पांडे हा आपल्या सहकारी शिपायांना नंतर इतका प्यारा वाटूं लागला कीं, त्याचीं संध्येचीं भांडीं जतन करून त्या भांड्यांची सर्वजण पूजाअर्चा करूं लागले. इतकेंच नव्हे तर त्याचें स्फूर्तिदायक नांव जो तो 'बंडखोर' शिपाई मोठ्या अभिमानानें घेऊं लागला. मंगल पांडेच्या प्राणज्योतीनें विझतां विझतां शेंकडों शिपायांचीं अंतःकरणें स्वातंत्र्याकांक्षेनें पेटवून दिलीं. या पेटलेल्या अंतःकरणांनींच १० मे १८५७ रोजीं मीरतला प्रथम क्रांतियुद्धाची उठावणी केली व अशा रीतीनें क्रांतियज्ञाच्या ज्वाला सर्वत्र भडकूं लागल्या.

● ● ●



# बहादुरशहा

10 मे १८५७ रोजीं मिरत येथें क्रांतियुद्ध सुरू झालें. घोडदळानें अचानक उठावणी केली व तुरुंग फोडून आपल्या सहकाऱ्यांना मुक्त केलें. इंग्रज अधिकाऱ्यांच्या बंगल्यांना आगी लावण्यांत आल्या आणि त्यांची कत्तल उडविण्यांत आली. दिल्लीकडे जाणाऱ्या तारायंत्राच्या ताराहि क्रांतिकारकांनीं तोडल्या. दिवस मावळतांच हें सर्व क्रांतिकारक सैन्य दिल्लीच्या रोखानें निघालें.

दिल्लीला या वेळीं तैमूर वंशांतील वृद्ध राजपुरुष मिर्झा अबुजाफर ऊर्फ महंमद बहादुरशहा 'पातशहा' असा किताब धारण करून गादीवर बसलेला होता. त्याची पातशाही इंग्रजांच्या कृपेनेंच आजवर टिकून होती. इंग्रजांकडून त्याला सालीना बारा लक्ष रुपये पेन्शन मिळत होतें. तथापि बादशहाचा सरंजाम व कुटुंबविस्तार मोठा असल्यामुळें बारा लक्षांची रक्कम त्याला पुरत नसे. पेन्शन वाढविण्याबद्दल इंग्रजांकडे त्यानें वारंवार विनंती-

अर्ज पाठविले. जॉर्ज थॉमसन् नांवाच्या इंग्रज वकिलामार्फतहि खटपट करून पाहिली; पण हे सर्व प्रयत्न वांया गेले व बहादुरशहाला स्वस्थ बसावें लागलें. इंग्रजांच्या डोळ्यांत बादशहाचें बारा लाखांचें पेन्शन एकसारखें खुपत होतें. इतकेंच नव्हे तर त्याचा 'पातशहा' हा किताबहि त्यांना सलत होता. इंग्रजांच्या सामर्थ्याला व सार्वभौमत्वाला पातशाहीचा अडसर दिवसें-दिवस सहन होईनासा झाला. बहादुरशहाला इंग्रज हळूहळू छळूं लागले. बादशहाच्या दरबारांत परंपरेनें नजराणा देण्याची पद्धत चालत होती ती इंग्रजांनीं १८४३ सालीं बंद केली. बादशहाच्या नांवचें नाणें बंद करण्यांत आलें. त्याचा इतर बडेजावहि कमी करण्यांत आला. या सर्वांवर कळस म्हणजे बादशहाच्या कुटुंबांतील अंतःकलहाला हातभार लावून इंग्रजांनीं घरभेदेपणा केला व बादशहाचा एक पुत्र मिरजा महंमद कुरेश याला फित-वून त्याजकडून एक अपमानास्पद करार लिहून घेतला. कुरेशनें बहादुर-शहाच्या मरणानंतर 'पातशाही' चा त्याग करावा, महिना पंधरा हजार रुपये पेन्शन घ्यावी व लाल किल्ला इंग्रजांचे स्वाधीन करून कुतुबमिनारजवळ राहण्यास जावें अशा प्रकारचा हा करार होता. हा करार कुरेशला मनांतून पसंत नव्हता. तथापि आपला धाकटा सावत्र भाऊ जवानबक्त (झीनत महालचा मुलगा) याच्याकडे वारसाहक्क जाण्यापेक्षां मिळेल तें पदरांत पाडून घ्यावें या हेतूनें त्यानें करारास वरकरणीं मान्यता दिली. सारांश, बहादुरशहा, त्याची तरुण बेगम झीनत महाल व पहिल्या बेगमेचे कायदेशीर वारसपुत्र या सर्वांनाच इंग्रजांनीं या नाहीं त्या रूपानें दुखविलें व दिल्लीची परंपरागत 'पातशाही' उखडून लावण्याचा त्यांनीं विडा उचलला.

मीरतपासून दिल्ली सुमारें चाळीस मैल. १० मेला रात्रीं क्रांतिकारक सैन्य जें घोडदौड करीत निघालें तें ११ मेला सकाळींच यमुनेचा पूल ओलांडून लाल किल्ल्यावर येऊन थडकलें. 'चलो दिल्ली—मारो फिरंगीको' अशा गर्जना करीत हें सैन्य चवताळून उठलें व त्यांनीं बादशहाच्या नांवाचा

जयजयकार केला. किल्ल्यांत थोडेंफार इंग्रज सैन्य होतें; पण क्रांतिकारक सैन्यापुढें त्यांनीं शरणागति पत्करली. शेंकडों इंग्रज शिपाई व अधिकारी क्रांतिकारकांच्या बंदुकींना बळी पडले. दिल्लींतील हिंदी फौजा क्रांतिकारकांना सामील झाल्या व मग सर्वांनीं तुरुंग फोडले, बँकेची नासधूस केली; सरकारी प्रेस जाळला व चर्चेसवर हल्ले केले. दिसेल त्या इंग्रज माणसावर क्रांतिकारक तलवार चालवूं लागले. दिल्लींत या वेळीं इंग्रजांचें मोठें शस्त्रागार होतें व तेथें दारुगोळाहि विपुल होता. क्रांतिकारकांची मोठी सेना जेव्हां या शस्त्रागाराकडे वळली तेव्हां ले. जॉर्ज विलोबीनें तें सबंध शस्त्रागार पेटवून दिलें व स्वतःसह सातआठ इंग्रजांची तेथें आहुति दिली.

दिल्ली एका दिवसांत क्रांतिकारकांच्या ताब्यांत आली. क्रांतिकारक सैन्यांत या वेळीं मुसलमानांचा भरणा अधिक होता. त्यांनीं बहादुरशहाला ११ मे रोजीं गादीवर बसविलें व तोफांची सलामी देऊन त्याच्या नांवाचा जयजयकार केला. दिल्लींत औषधालाहि इंग्रज उरला नाहीं. बादशहाच्या दृष्टीनें हा साराच प्रकार अनपेक्षित व अद्‌भुत होता. ज्या 'पातशाही' साठीं व तिच्या प्रतिष्ठेसाठीं आपण अर्जाविनंत्या करीत होतों ती पातशाही इंग्रजांचें रक्त सांडून आपल्या बांधवांनीं आपल्या शिरावर पुन्हां आणून ठेवली आहे! अलम दुनियेचा मी पुन्हा पातशहा झालों! खरंच का हें? फिरंग्यांच्या मगरमिठींतून सुटलों मी? काल फिरंगी इथें माझ्यावर डोळे वटारून पहात होते आणि आज? कुठें गेले ते? स्वर्गात? जाऊं देत—स्वर्गात जाऊं देत नाहीं तर नरकांत जाऊं देत! मी बादशहा झालों खरा; पण आतां या अगणित सैन्याला पगार कुठून देऊं? 'पगाराची फिकीर नको हुजूर. इंग्रजांचे तमाम खजिने लुटून आम्ही आपल्या चरणांशीं आणून ओतूं. शिर सलामत तो पगडी पचास!' बादशहाची चिंता क्रांतिकारकांनीं तत्काळ दूर केली. अशा रीतीनें बहादुरशहा वयाच्या ८० व्या वर्षी खऱ्या अर्थानें बादशहा झाला व क्रांतिकारक पुढाऱ्यांचें सल्लागार मंडळ नेमून राज्यकारभार

करूं लागला. बादशहाच्या नांवाचे वेळोवेळीं जाहीरनामे निघूं लागले. खुद बादशहा घोड्यावर बसून दिल्लींतून फिरूं लागला !

बहादुरशहाची ही बादशाही औटघटकेचीच ठरली. ११ मे रोजीं तो बादशहा झाला व २० सप्टेंबरला म्हणजे सुमारें चार महिन्यांनीं—' पातशाही ' वगैरे सोडून जिवानिशीं पळून जाण्याचा त्याच्यावर प्रसंग गुदरला. राज्यसत्ता स्थिर स्वरूपांत टिकण्यासाठीं राज्ययंत्र सुनियंत्रित पाहिजे व त्या राज्याच्या रक्षणासाठीं सैन्याचीहि उत्तम व्यवस्था पाहिजे. बादशहाला या दोन्ही गोष्टी साधल्या नाहींत. तो स्वतः वृद्ध झाला होता व मनांतून इंग्रजांना भीतच होता. क्रांतिकारक सैन्य शहरांत अगणित होतें ; पण तें संघटित व शिस्तबद्ध नव्हतें. इंग्रजांना हाकलून बादशाहीची प्रस्थापना करण्यांत या सैन्यानें जी धडाडी व शौर्य दाखविलें तें पुढें दाखविलें नाहीं. सैन्याची जमवाजमव करून इंग्रज दिल्लीवर पुन्हां चालून येतील ही कल्पना त्यांना शिवली नसेल असें कसें म्हणावें ? पण नुसती कल्पना शिवून उपयोग काय ? इंग्रजांना तोंड देण्यासाठीं जी पूर्वसिद्धता करायला हवी होती ती क्रांतिकारकांनीं मुळींच केली नाहीं. उलट ऐषाराम, लुटालूट, निरपराध इंग्रज ख्रिस्ती नागरिकांची कत्तल इत्यादि कृत्यें करण्यांतच क्रांतिकारकांचा काळ गेला. याचे भीषण परिणाम लौकरच सर्वांना भोगावे लागले व नव्यानें स्थापिलेली ' पातशाही ' समूळ नष्ट झाली !

जूनच्या आरंभीं हेन्री बर्नार्ड याच्या नेतृत्वाखालीं इंग्रजांनीं शिख व गुरखा पलटणींच्या साहाय्यानें दिल्लीवर चढाई केली. इंग्रज व बंडखोर यांच्यांत वारंवार चकमकी झडूं लागल्या. बरेलीचा बख्तखान याला बहादुरशहानें सेनापति नेमलें. याच वेळीं पंजाबांतून इंग्रजांना ताज्या दमाची कुमक आली. जुलै महिन्यांत बर्नार्ड महामारीनें वारला व त्याच्या जागीं ब्रिगेडियर विल्सन आला. इंग्रजांच्या तोफखान्यापुढें क्रांतिकारक सैन्याचा निभाव लागेना. त्यांनीं वारंवार कडवा प्रतिकार केला; पण त्या प्रतिकारांत

योजना नव्हती. इंग्रजांचा जसजसा जोर वाढत चालला तसतसें क्रांतिकारकांचें मनोधैर्य ढळूं लागलें. खुद्द बादशहा निराश झाला. दिल्लींतील बाजार बंद पडले. हिंदुमुसलमान आपसांत भांडूं लागले. हिंदुमुसलमानांत ऐक्य राहावें या हेतूनें बादशहानें गोहत्येला प्रतिबंध केला; पण तरीसुद्धां बजबजपुरी थांबली नाहीं. ७ ते १३ सप्टेंबरच्या दरम्यान इंग्रजांच्या तोफखान्यानें निकाराचे हल्ले चढवून कोटास खिंडारें पाडलीं व १४ सप्टेंबरला इंग्रज दिल्लींत शिरले. सेनापति बख्तखानानें बादशहाला दिल्लीबाहेर पडून लढाई देण्याचा सल्ला दिला; पण बादशहा या गोष्टीला तयार होईना. इंग्रजांचा पराजय करण्याचे सारे प्रयत्न वांया जात होते. बादशहाला एकाच गोष्टीची आशा वाटत होती आणि ती म्हणजे हिंदु राजेरजवाड्यांच्या मदतीची. आपल्या सैन्याची अनिवार्य पीछेहाट लक्षांत येतांच बादशहानें जयपूर, जोधपूर, बिकानेर, अलवार इत्यादि राजांना स्वहस्तें पत्रें पाठवून मदतीची याचना केली होती. इतकेंच नव्हे तर 'आपण सर्व संघराज्य स्थापन करूं, वाटल्यास मी माझ्या पातशाहीचा त्याग करतों—पण फिरंग्यांना हांकलून लावूं.' अशा अर्थाचें आश्वासनहि त्यानें दिलें; पण या पत्राचा कांहीं उपयोग झाला नाहीं. बादशहाच्या कठीण समयाला कोणीहि कामास आला नाहीं !

१७ सप्टेंबरला क्रांतिकारकांचा मोड झाला व लाल किल्ल्यांत इंग्रज घुसले. सर्वत्र पळापळ सुरू झाली. २० सप्टेंबरला किल्ल्यावर युनियन जॅक फडकूं लागलें. बादशहा घाबरून बेगमेसह हुमायुनाच्या कबरींत जाऊन लपला. रज्जबअली नांवाच्या हेरानें ही वार्ता इंग्रजांना कळविली. २० सप्टेंबरला मेजर हॉडसन पन्नास सैनिकांची तुकडी घेऊन कबरीजवळ आला व त्यानें बादशहाला पुढील निरोप पाठविला, 'शस्त्रें खालीं ठेवून विनाअट ताबडतोब स्वाधीन व्हा. नाहीं तर पुढचे परिणाम भोगण्यास सिद्ध व्हा !' बादशहाकडून दोन तासांनीं निरोप आला कीं, 'स्वाधीन होतों; पण तत्पूर्वीं

माझ्या जिवाला अपाय होणार नाहीं याचें आश्वासन द्या!' हॉडसननें तसें आश्वासन देतांच बादशहा, बेगम झीनत महाल व तिचा मुलगा जुम्माबक्ष हे गंभीर मुद्रेनें बाहेर आले. बेगम पालखींत होती. बाहेर येतांच बादशहानें आपली रत्नखचित तलवार हॉडसनच्या स्वाधीन केली. या वेळीं आजू-बाजूला जमलेल्या शेंकडों लोकांना रडूं कोसळलें. बहादुरशहा आतां कैदी झाला होता. हॉडसननें त्याला लाल किल्ल्यांत आणून मुलकी अधिकाऱ्यांच्या ताब्यांत दिलें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं हॉडसन व ले. मॅकडोवेल पुन्हां हुमायुनाच्या कबरीकडे गेले व त्यांनीं बादशहाच्या दोन मुलांना व एका नातवाला कैद केलें. बैलगाडींतून त्यांना दिल्लीकडे आणीत असतां वाटेंत हॉडसननें गाडी थांबविली. सर्व रस्ते रोखले व त्या तिघां राजपुत्रांना खालीं उतरण्यास सांगितलें. राजपुत्र खालीं उतरल्यावर हॉडसननें त्यांचें जडजवाहीर काढून घेतलें व मग राजपुत्रांच्या अपराधांचा पाढा वाचून त्या क्रूरकर्म्यानें स्वतःच्या पिस्तुलानें तिन्ही राजपुत्रांना गोळ्या घालून ठार मारलें! हॉडसनचें हें कृत्य पाहून शिख सैनिक आनंदानें नाचले.

२७ जानेवारी १८५८ रोजीं बहादुरशहाची दिवाण–इ–खास–मध्यें लष्करी कोर्टापुढें चौकशी सुरू झाली. बहादुरशहावर चार आरोप ठेवण्यांत आले होते. (१) इंग्रजांचा पेन्शनर असून त्यानें बंडखोर सैनिकांना उत्तेजन दिलें व मदत केली. (२) स्वतःच्या पुत्रांना बंड करण्यास प्रवृत्त केलें. (३) बादशहा म्हणून स्वतःची द्वाही फिरविली व बंडखोरांचें नेतृत्व पत्करलें. (४) सोळा मे रोजीं ४९ इंग्रज व ख्रिस्ती लोकांची हत्या करविली. खटल्याचें कामकाज २१ दिवस चाललें व २९ मार्चला तें संपलें. बादशहानें या सर्व आरोपांचा इन्कार केला व 'मी दोषी नाहीं' असें त्रिवार सांगितलें; पण अखेर इंग्रजांनीं त्याला जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा दिली व लगेच कलकत्तामार्गें ब्रह्मदेशांत पेगू येथें त्याची रवानगी केली. पेगू येथील

तुरुंगवासांतच दिल्लीचा हा शेवटचा वृद्ध मोगल बादशहा १८६२ सालीं पैगंबरवासी झाला. मरणसमयीं त्याचें वय सुमारें ८२ होतें.

बहादुरशहा मोठा रसिक, कलासक्त व धार्मिक वृत्तीचा मनुष्य होता. तो स्वतः जफर या नांवानें कविता करीत असे. संकटकाळीं एकदां त्याला कुणी तरी विचारलें—

दुमदुमाये दम नहीं अब, खैर मांगो जानकी
अय जफर ठंडी हुई शमशेर हिंदुस्थानकी

'हे बादशहा, वयपरत्वें तुझ्यांत आतां दम उरलेला नाहीं. इंग्रजांकडे तूं आपल्या प्राणांची भीक माग; कारण हिंदुस्थानची समशेर आतां थंड झाली आहे !' या लाचार पृच्छेला बादशहानें पुढील बाणेदार उत्तर दिलें—

गाझीयोमें बू रहेंगी जब तलक ईमानकी
तबतो लंडन तक चलेगी तेग़ हिंदुस्थानकी

'जेथपर्यंत आमच्या लढवय्यांच्या अंगांत स्वातंत्र्याच्या आकांक्षेचा शेवटचा बिंदु आहे तेथपर्यंत हिंदुस्थानची तलवार लंडनपर्यंत लढत राहील !'

वृद्धापकाळीं क्रांतिकारक सेनेचें नेतृत्व करून, त्यांना स्फुरण देऊन व मदत करून बहादुरशहानें इंग्रजांच्या सत्तेशीं टक्कर दिली हीच त्याची बहादुरी ! कित्येक विद्वान् पंडित बहादुरशहा हा अनिच्छेनें व दडपणानें क्रांतियुद्धांत सामील झाला असा आक्षेप घेतात; पण त्याला झालेली शिक्षा, हिंदुराजांना इंग्रजाविरुद्ध लढण्यासाठीं त्यानें पाठविलेलें पत्र इत्यादि गोष्टींचा साकल्यानें विचार केला म्हणजे बहादुरशहावरील हा आरोप फोल ठरतो व बहादुरशहाच्या दिव्य साहसाबद्दल आदरच वाटूं लागतो.

● ● ●



# नानासाहेब

दुसऱ्या बाजीरावाचा दत्तकपुत्र धोंडोपंत ऊर्फ नानासाहेब याचें चरित्र अनेक नाट्यपूर्ण घटनांनीं भरलेलें आहे. सत्तावनच्या क्रांतियुद्धांत नानासाहेबाइतका बोलबाला दुसऱ्या कोणत्याहि नेत्याचा झाला नाहीं. इंग्रज इतिहासकारांनीं नानासाहेबाचें चित्र इतकें भडक व विकृत रीतीनें रंगविलेलें आहे कीं, नानासाहेब म्हणजे जणुं कांहीं क्रूरतेचा पुतळाच! बकलंडच्या चरित्रकोशांत नानासाहेबाचें वर्णन पुढील शब्दांत केलेलें आढळतें 'नानासाहेब हा बंडांतील प्रमुख पुढारी असून त्याचें पाशवी क्रौर्य व विश्वासघातकीपणा कधींहि विसरला जाणार नाहीं!' इंग्रजांनीं रंगविलेलें नानासाहेबाचें हें चित्र कितपत बरोबर आहे?

सत्तावनच्या क्रांतियुद्धांत नानासाहेब जूनच्या आरंभीं सामील झाले. तत्पूर्वीचें त्यांचें चरित्र आधीं समजावून घेतलें पाहिजे. दुसरा बाजीराव सालीना आठ लक्ष रुपयांचें पेन्शन घेत बिठूर ऊर्फ ब्रह्मावर्त येथें सुखानें

कालक्रमणा करीत होता. उतारवयांत बाजीरावाला एकच चिंता होती आणि ती म्हणजे आपल्यामागें आपल्या पुत्राला पेन्शन चालू राहील किंवा नाहीं? बाजीराव १८५१ च्या जानेवारीअखेर बिटूर येथें वारला. पुत्राला पेन्शन चालू राहावी म्हणून त्यानें आपल्या हयातींत खटपट केली होती; पण इंग्रजांनीं पेन्शन पुढें चालू ठेवण्यास साफ नकार दिला. बाजीरावाच्या निधनानंतर नानासाहेबानें त्याची उत्तरक्रिया यथासांगरीतीनें केली व तीन लक्ष रुपये खर्च केले. या प्रसंगीं भूमिदान करण्याची रघुनाथराव विंचूरकरांनीं जेव्हां विनंति केली, तेव्हां नानासाहेबानें त्यांना आपलें दुखणें पुढील शब्दांत सांगितलें, ‘ येथील विद्यमान स्थिति कशी झाली आहे हें तुम्ही जाणतच आहांत. इंग्रेज सरकारकडून महाराजांस चाललेली नेमणूक आम्हांकडेस पुढें चालेल अशी उमेद वाटत नाहीं. खर्च तर बहुत लागतो. तो कमी करण्याकरितां कांहीं मंडळीस रजा द्यावी असा विचार मनांत आणिल्यास जा म्हणून तरी कोणास सांगावें? मंडळी कमी केल्याशिवाय तर गत्यंतर दिसत नाहीं. अशा प्रकारचा मोठा वाईट प्रसंग शेवटीं माझे माथीं आला आहे. पुढें नेमणूक चालावी अशाविषयीं गवरनर जनरल यांस विनंति कर्तव्य आहे. याकरितां कांहीं दिवस तुम्हीं येथें असावें अशी माझी इच्छा आहे.’ नानासाहेबाच्या मनाला झोंबत असलेल्या वेदना किती तीव्र होत्या हें या उद्गारावरून स्पष्ट दिसतें. रघुनाथरावांना यात्रेला जायचें असल्यामुळें ते अर्थात् थांबले नाहींत; पण बिठूर सोडून निघतेवेळीं नानासाहेबानें त्यांना पोषाख देऊं केला, सुपारी दिली व नारायण मराठेबरोबर एक घोडा दिला.

नानासाहेब हा आपल्या ‘ तीर्थरूपां ’ प्रमाणेंच आतिथ्यशील व मिठ्ठास बोलणारा होता. स्वकीयांशींच नव्हे तर इंग्रजांशींहि तो स्नेहानें वागत होता. बिठूरला वारंवार इंग्रज स्त्रीपुरुष येत व नानासाहेबाचा पाहुणचार घेऊन परत जात. नानाहि अधूनमधून कानपूरला जात असे. इंग्रजी चालीरीतींचें अनुकरण करण्यांत नानासाहेबाला प्रौढी वाटे. तो स्वतः हळूहळू इंग्रजी बोलूं

लागला व लिहूं लागला. नानासाहेबाचा जन्म १८२४ सालचा. बाजीरावानें ७ जून १८२७ रोजीं त्यांना दत्तक घेतलें. माथेरानजवळील माधव नारायण भट यांचा नानासाहेब हा थोरला मुलगा. नानासाहेबाचे धाकटे दोन बंधूहि बाजीरावानें पुढें दत्तक घेतले. विंचूरकरांनीं 'तीर्थयात्रा प्रबंधां'त नानासाहेबाचें १८५० च्या सुमाराचें वर्णन दिलें आहे. त्यावरून नानासाहेब रोज सकाळीं मैदानांत 'घोड्याचे फेर' धरीत व 'बोथाटीचे खेळ' खेळत असत. पिराजी राजे, तात्या टोपे, बाबा भट, नारायण मराठे हे नानासाहेबाचे स्नेही होते. नानासाहेबाच्या राजवाड्यांत कधींकधीं रात्रीं कंचन्यांचे नाच व देशी गवयांच्या बैठकी होत असत. या मजलसींना खुद्द विंचूरकर हजर असत. नानाच्या राजवाड्यांत पाश्चात्य पद्धतीचीं अनेक चित्रें व फर्निचरस् होतीं. इंग्रज अधिकाऱ्यांसारख्या बग्याहि त्यानें ठेवलेल्या होत्या.

पेन्शन चालू राहावी यासाठीं नानासाहेब कोर्ट ऑफ डायरेक्टरपर्यंत भांडला. अजिमुल्लाखान नांवाच्या विश्वासू माणसाला त्यानें या कामासाठीं इंग्लंडला पाठविलें; पण कंपनी सरकारनें नानाला शेवटपर्यंत दाद दिली नाहीं. पेन्शन वारसदारांना मिळावी किंवा नाहीं हा उभयपक्षांत वादाचा मुद्दा होता. इंग्रज हे सत्ताधीश असल्यानें या वादांत त्यांचा निकाल निर्णायक झाला. लॉर्ड डलहौसीनें या वादांत 'भोगलें तेवढें पेन्शन पुरें झालें!' अशी लंगडी सबब पुढें करून आर्थिक कारणास्तव पेन्शनीच्या प्रकरणावर पडदा टाकला. ज्या नानाचें रुचकर अन्न शेंकडों इंग्रज स्त्री-पुरुषांनीं सुखेनैव खाल्लें त्यांनींच अखेर त्याचा विश्वासघात केला! इंग्रजांनीं नानाला नुसत्या पेन्शनीबाबतच दुखविलें असें नाहीं, तर आणखीहि एका घरगुती भांडणांत शिरकाव करून त्यांनीं त्याला डिवचलें. १८५७ च्या एप्रिल महिन्यांत म्हणजे कानपूरप्रकरणापूर्वीं सुमारें दोन महिने बाजीरावाच्या एका नातलगानें वांटणीसंबंधीं नानावर एक दावा लावलेला होता. फिर्यादी अज्ञान असल्यामुळें इंग्रजांनीं त्याचें पालकत्व अंगावर घेतलें व नानासाहेबाच्या घरच्या

वायकांना समन्सें काढून त्यांना कोर्टाची पायरी चढायला लावली. क्रांतियुद्धांत भाग घेण्यापूर्वी नानासाहेबाची मनःस्थिति कशी असेल, याची कल्पना प्रस्तुतच्या दोन प्रकरणांवरून येते.

नानासाहेब क्रांतियुद्धांत स्वेच्छेनें पडले नाहींत तर कानपूरच्या बंडखोरांनीं त्यांना नेतृत्व करण्यास भाग पाडलें असें कित्येक इतिहासकारांचें मत आहे. तें अर्थात् चुकीचें वाटतें. इंग्रजांविषयीं आजूबाजूला फैलावलेल्या असंतोषाची नानासाहेबाला जाणीव होती. अयोध्येचें राज्य खालसा होतांच नानानें आपल्याजवळील ४७ लक्ष रुपयांच्या प्रॉमिसरी नोटा विकून ती रक्कम सुरक्षित जागीं गुंतवून टाकली. विठूरपासून कानपूर अवघें सातआठ मैल होतें. कानपूरला नानासाहेब वारंवार जात असत. क्रांतियुद्धाचा भडका उडण्यापूर्वीं नाना दिल्ली, लखनौ या ठिकाणीं जाऊन आला होता व आपले कित्येक हस्तक त्यानें आसपासच्या प्रदेशांत पाठविले होते. वरकरणीं इंग्रजांशीं तो स्नेह दाखवी; पण त्याच्या अंतर्यामीं इंग्रजांविरुद्ध द्वेष धुमसत होता. लंडनहून अजिमुल्ला जेव्हां हात हलवीत परत आला तेव्हां नानासाहेबानें कृतनिश्चय केला कीं, आतां अर्जविनंत्यांची भाषा बंद ! फिरंग्यांना तलवारीनेंच उत्तर दिलें पाहिजे ! शिकारी दबा धरून बसावा त्याप्रमाणें विठूरच्या राजवाड्यांत नानासाहेब अनुकूल संधीची वाट बघत बसला. गंगेच्या कांठीं स्नानसंध्या करतेवेळींहि त्याच्या डोक्यांत एकच विचार घोंघावत असला पाहिजे ! फिरंग्यांचा सूड कसा घेऊं ? स्वतःवर झालेल्या अन्यायामुळेंच केवळ नानासाहेब इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रवृत्त झाला असेंहि नाहीं. आठ लाख पेन्शन बुडण्यानें नानासाहेबाची वैयक्तिक हानि झाली. तथापि या हानीमुळें नाना अन्नाला कांहीं मोताद झाला नव्हता. पेन्शन बुडण्यानें विठूरच्या परिसरांतील त्याच्या शेकडों आश्रितांच्या पोटावर पाय येणार होता आणि हाच गंभीर प्रश्न होता. बाजीरावानें पेशवाईचें उदक इंग्रजांच्या हातावर सोडिलें होतें व त्या कृत्याच्या

मोबदल्यांत इंग्रजांकडून त्याला व त्याच्या कुटुंबियांना सालीना आठ लाख रुपये मिळत होते. बाजीरावाच्या निधनानंतर ही रक्कम मराठी राज्याची इभ्रत म्हणून तरी इंग्रजांनीं त्याच्या वारसांना चालू ठेवणें अत्यावश्यक होतें. पेन्शन बंद होणें म्हणजे पेशवाईच्या गादीचा अपमान होता. पेन्शन चालू ठेवण्यांत इंग्रजांची कृतज्ञताबुद्धि दिसली असती; पण इंग्रजांनीं ही पेन्शन बंद करून मराठी सत्तेच्या वारसदारांना कस्पटासमान लेखलें ! नानासाहेब करंट्या दुसऱ्या बाजीरावाचा पुत्र असला तरी थोरल्या बाजीरावाचाहि तो वंशज होता. क्रांतियुद्धांत तो पडला या घटनेला वैयक्तिक त्याचप्रमाणें राजकीय बाजूहि आहे. फिरंग्यांच्या हातून आपलें राज्य पुन्हां घेतलें पाहिजे ही आकांक्षा नानासाहेबाच्या मनांत निःसंशय असली पाहिजे. प्रत्यक्ष क्रांतियुद्धांतील त्याच्या हालचाली त्याच्या अंतरंगावर आणखी प्रकाश टाकतात.

कानपूरला प्रत्यक्ष उठावणी ५ जूनला झाली; पण तत्पूर्वी या उठावणीची योजना शिजत होती. मे महिन्यांत मिरत-दिल्ली येथील बंडाळीच्या वार्ता कानपूरला येऊन पोंचतांच हिंदी फौज बिथरून गेली. कानपूरला कंपनी सरकारचा बारा लाख रुपयांचा खजिना होता व संपन्न शस्त्रागार होतें. कानपूर छावणीचें आधिपत्य सर व्हीलरकडे होतें. व्हीलरच्या हाताखालीं दोन पलटणी व घोडदळ तुकडी मिळून सुमारें ३००० हिंदी फौज होती. या फौजेंत इंग्रज शिपाई दोन-अडीचशें होते. हिंदी फौज उठली तर आपला निभाव लागणार नाहीं याची इंग्रज अधिकाऱ्यांना पूर्ण जाणीव होती. कारण एक तर ते संख्येनें कमी होते व दुसरें म्हणजे बाहेरून त्यांना कुमक येणें जवळजवळ अशक्य होतें. कानपुरांतील परिस्थिति दिवसेंदिवस इतकी स्फोटक झाली कीं, एकदां बाजारांत एका इंग्रज स्त्रीला हिंदी शिपायानें स्वच्छ बजावलें कीं, 'यापुढें बाजारांत येण्याचा प्रसंग तुमच्यावर पुन्हां येणार नाहीं !' १५ मेच्या सुमारास कानपूरच्या कलेक्टरनें बिठूरला

नानासाहेबाकडे मदतीसाठीं निरोप पाठविला. नानाला इंग्रज अधिकारी अजूनहि दोस्त समजत होते आणि इथेंच त्यांची फसगत झाली.

इंग्रजांचें आपणहून बोलावणें येतांच नानासाहेब तात्या टोपेसह २०० शिपाई व २ तोफा घेऊन कानपूरला आले व नवाबगंजांत राहूं लागले. इंग्रजांनीं खजिन्याच्या रक्षणाचें काम त्यांचेवर सोंपविलें. २२ मेपासून नाना हें काम पाहूं लागला. दुसरीकडे एक सुरक्षित जागा वघून इंग्रजांनीं सर्व बायकामुलांसह तेथें आश्रय घेतला. या जागेंत एक दोन इमारती व कामचलाऊ हॉस्पिटल होतें. जागेभोंवतीं खंदक खणण्यांत येऊन चार फूट उंचीची एक तटबंदी उभारण्यांत आली. दरम्यान क्रांतिकारक फौज उठावासाठीं अधीर झाली. त्यांच्यापैकीं सुभेदार टिकासिंह, शमसुद्दीन इत्यादींनीं नानासाहेबाचा हस्तक आजिमुल्ला याच्याशीं संधान बांधलें. जूनच्या आरंभीं नानासाहेबासह आजिमुल्ला, टिकासिंह, ज्वालाप्रसाद, तात्या टोपे इत्यादि नेते गंगेच्या कांठीं गेले व नावेंत बसून त्यांनीं दीर्घकाळ वाटाघाटी केल्या. या वाटाघाटी उठावणीच्याच होत्या.

६ जूनला प्रथम घोडदळानें बंड पुकारलें व जाळपोळ करीत त्यांनीं खजिना लुटला. या वेळीं नानासाहेबाच्या खाजगी फौजेनें कोणताहि प्रतिकार केला नाहीं. खजिन्यांतील कांहीं रक्कम नानासाहेबाचे स्वाधीन करून क्रांतिकारक सैन्य दिल्लीकडे निघालें; पण नानासाहेबानें त्यांना वाटेंतून परत फिरवून कानपुरांत आणलें व इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रवृत्त केलें. इंग्रजांच्या छावणीवर हल्ला करण्यापूर्वीं नानासाहेबानें व्हीलरला पूर्वसूचना दिली. ६ ते २६ जूनपर्यंत उभयपक्षांत गोळीबार चालू होता. क्रांतिकारकांच्या तोफांनीं इंग्रजांची छावणी छिन्नविछिन्न करून टाकली. त्यांचें अन्न तुटलें, पाणी संपलें, दारुगोळा सरला व हॉस्पिटलमधील सर्व सामानहि खर्ची पडलें. शत्रूच्या तोफगोळ्यांनीं इंग्रजांचीं बायकामुलें पटापट मरूं लागलीं. त्या सर्वांना जवळच्या एका विहिरींत टाकण्यांत आलें. इंग्रज टेकीला आले.

कडक उन्हाळा त्यांना सोसवेना. उपासमारीनें मरणें किंवा शरण जाणें एवढाच त्यांचेपुढें मार्ग होता. इतक्यांत नानासाहेबानें अजिमुल्लामार्फत निर्वाणीचें पत्र पाठविलें कीं, 'बऱ्या बोलानें शस्त्रें खालीं ठेवून शरण याल तर अलाहाबादला सुरक्षित पोंचविण्याची व्यवस्था करतों.' व्हीलरनें निरुपायानें ही अट मान्य केली व तहाचें निशाण उभारलें.

२७ जूनला तात्या टोपेनें नानासाहेबाच्या आज्ञेनुसार गंगेच्या कांठीं 'सती चौरा' घाटाशीं ४० नावा सिद्ध ठेवल्या. व्हीलरसह सर्व इंग्रज स्त्रीपुरुष व मुलें तेथें आलीं; पण बोटींत बसतांच दोन्ही कांठच्या फौजेनें त्यांच्यावर अचानक गोळीबार सुरू केला. कित्येक शिपाई पाण्यांत उतरले व त्यांनीं कत्तलीस सुरुवात केली. कत्तलींत प्रायः सर्व इंग्रज पुरुष मारले गेले. उरलेल्या बायकामुलांना कैद करून क्रांतिकारकांनीं बिबिघरांत कोंडून ठेवलें. हा अमानुष प्रकार झाला त्या वेळीं नानासाहेब आपल्या गोटांत होते. घाटावर फक्त तात्या, अजिमुल्ला व टिकासिंग होते. दुसऱ्या दिवशीं नानासाहेबानें दरबार भरवून आपल्या नांवाची कानपुरांत द्वाही फिरविली, सैनिकांचे मुजरे घेतले, त्यांना एक लाख रुपये पगार वांटला व तोफा उडवून विजयोत्सव साजरा केला. दिल्लीच्या बादशहाला १०१ तोफांची सलामी दिली व भगव्या झेंड्याबरोबर हिरवा चांदहि फडकविला. बाळारावास गव्हर्नर जनरल नेमण्यांत येऊन ज्वालाप्रसादला सेनापति करण्यांत आलें. फौजेच्या दोन तुकड्या करून एकास 'हनुमान' व दुसरीस 'महंमद' अशीं नांवें देण्यांत आलीं. नंतर सिंहासनावर बसून नानासाहेबानें एक उत्तेजनपर भाषण केलें व सैन्याला शाबासकी दिली. अशा रीतीनें कानपुरांतील इंग्रजांची सत्ता गंगार्पण झाली !

१ जुलैला नानासाहेब 'जोशीबुवास मुहूर्त विचारून' विठूर येथें निघाले- 'हजारों स्वार व पायदळ पुढें चालत होतें व मागेंपुढें रोहिले, अरब, शिदी यांचा पहारा चालला होता. चौघडा, वाजंत्रीं, ताशे, नगारे, शिंगें वगैरे

अनेक मंगल वाद्यें वाजत होतीं. याप्रमाणें हळूहळू थाटानें मिरवीत मिरवीत व भालदार वारंवार पुकारत जातां जातां रात्र पडली, तेव्हां वाटेनें शेंकडों चंद्रज्योति लाविल्या. शेवटीं स्वारी ब्रह्मावर्तास पोंचली. शहर गुढ्यातोरणें वगैरे अलंकारांनीं शोभिवंत केलें होतें व नागरिक लोक पुष्पें-दूर्वा स्वारीवर टाकीत होते. नानासाहेब पालखींत बसले होते व बाळासाहेब आणि राव-साहेब हत्तींवर अंबारींत बसून बाजूनें चालत होते. अशा थाटानें स्वारी वाड्यांत येऊन पोंचली. याप्रमाणें तिकडे जिकडे शहरांत आनंदोत्सव होऊन नाचतमाशे चालू झाले.' बिठूरला आल्यावर नानासाहेबानें राज्याभिषेकाची तयारी केली. सर्वत्र रोषणाई केली. शहराचें संरक्षण करण्यासाठीं तटबंदी करून गंगेच्या बाजूनें ध्रुवघाटापासून मोर्चे बांधून तोफा लावून ठेवल्या.' इतकी व्यवस्था झाल्यावर नानासाहेबानें राज्याभिषेक करून घेतला व जाहीरनामे काढून ते कानपूरचा कारभार बघूं लागले.

कानपूरच्या घाटावरील कत्तलीची हकीकत समजतांच हॅवलॉक, रिनॉड व नील हे इंग्रज सेनापति क्रांतिकारकांचा सूड घेण्यासाठीं निघाले. अलाहाबाद व फत्तेपूर येथें इंग्रजांनीं क्रांतिकारकांचा पराभव करून त्यांची भयंकर कत्तल केली व ते त्वरेनें कानपूरकडे निघाले. बिबिघरांत दीडदोनशें इंग्रज बायकामुलें कैदेंत होतीं व त्यांना दळणकांडणासारखीं कामें देण्यांत आलीं होतीं. या बायकामुलांना सोडविण्यासाठीं नील नी हॅवलॉक मोठ्या त्वेषानें व त्वरेनें कानपूरच्या परिसरांत येऊन पोंचले; पण तत्पूर्वींच क्रांतिकारकांनीं त्या सर्व इंग्रज स्त्रीमुलांची निर्दयपणें कत्तल केली व त्यांचीं प्रेतें जवळच्या एका विहिरींत टाकून दिलीं. अशा तऱ्हेची अमानुष कत्तल व्हायला नको होती; पण ती कां झाली याचेंहि कारण समजावून घेतलें पाहिजे. कैदेंत ज्या स्त्रिया होत्या त्यांच्यापैकीं एकीनें एका भंगिणीस फितूर करून अलाहाबादच्या इंग्रज अधिकाऱ्यांना देण्यासाठीं एक पत्र दिलें. हें पत्र पहारेकऱ्यानें पाहिलें व त्यानें भंगिणीस व त्या इंग्रज स्त्रीस कैद करून नाना-

साहेबांपुढें उभें केलें. भंगिणीला पंचवीस फटक्यांची शिक्षा देतांच तिनें फितुरीची कबुली दिली. हा प्रकार समजतांच नानासाहेबाचे अनुयायी खवळले व त्यांनीं ‘सर्व स्त्रियांना ठार मारा!’ असा आग्रह धरला; पण नानासाहेबानें हुकूम केला कीं, ‘स्त्रियांस मारणें हें रास्त नाहीं, याकरितां जिनें फितूर केला तीस मात्र तोफेच्या तोंडीं द्यावें.’ पण हा सल्ला अनुयायांना न पटून त्यांनीं मोठ्या आवेशानें बिबिघरावर चाल केली व तरवारीनें व बंदुकांनीं तेथील बायकामुलांचा चेंदामेंदा केला. या कत्तलीपूर्वी खुद्द बिठूरला असाच एक प्रसंग आला होता. अलाहाबादकडे जाणारी एक नाव गोलंदाजानें हेरली व ‘ताबडतोब श्रीमंतांस जाऊन कळविलें कीं, एक नाव गोरे लोकांनीं भरलेली चालली असून त्यांत बहुतेक बायका आहेत; हुकूम झाल्यास नाव टप्प्यांत आल्यावर गोळा टाकतों!’ यावर नानासाहेबानें असा जबाब दिला कीं, ‘नावेंत जर बायकामुलें असतील तर त्यांस मारण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं.’ पुढें ही नाव दुर्दैवानें वाळूंतच रुतली व मग माथेफिरू गोलंदाजांनीं गोळे उडवून ती पेटवून दिली व तिच्यांतील बहुतेक बायकामुलें जळून मेलीं! कानपूरच्या बिबिघरांतील कत्तलीपूर्वी क्रांतिकारकांच्या कानावर फत्तेपूर व अलाहाबाद येथें इंग्रजांनीं केलेल्या कत्तलींच्या वार्ता आल्या होत्या. त्यांचीं आधींच पेटलेलीं मनें या वार्तांमुळें आणखीच भडकलीं व त्या तापलेल्या मनःस्थितींत त्यांनीं ‘बिबिघरा’ ची यमपुरी केली. घाटावरील प्रकाराची साद्यंत हकिकत हॅवलॉक प्रभृतींना कळूं नये हेंहि एक कारण कत्तलीच्या मुळाशीं असावें. तात्पर्य हें कीं, कानपूरला झालेल्या दोन्ही कत्तलींत (२७ जून व १५ जुलै) नानासाहेबाचा प्रत्यक्ष संबंध नव्हता. अनुयायांनीं नानाच्या अपरोक्ष त्यांची आज्ञा न घेतां या कत्तली केलेल्या आहेत. कत्तलींना उत्तेजन नानाच्या हस्तकांनीं दिलें व प्रत्यक्ष कत्तल अझिझनबेगम, सुरवरखान व इतर पांच कसाई यांनीं केली. सर जॉर्ज फारेस्ट, मिचेल, कॅंपबेल इत्यादि ग्रंथकारांनीं

नानासाहेबाचा कत्तलीशीं संबंध नव्हता असें स्पष्ट नमूद केलें आहे. सर्व-सामान्य इंग्रज माणसांनीं व लेखकांनीं कत्तलीची जबाबदारी नानावर टाकली याचें कारण कत्तलीच्या वेळीं नानासाहेब नेते व सूत्रचालक होते.

कानपूरवर इंग्रजी फौजा चालून आल्याचें कळतांच नानासाहेबांनीं युद्धाची सिद्धता केली. देवास नमस्कार करून नानासाहेब, बंधु बाळासाहेब व पुतणे रावसाहेब बिठूरहून निघाले. तात्या टोपे, लालपुरीबुवा गोसावी व जळका रामभाऊ फौजा घेऊन आधींच पुढें गेले होते.इंग्रजांची कवायती फौज संख्येनें मोठी व ताज्या दमाची होती. दोन्ही पक्षाला तोफा सारख्या होत्या. नानासाहेबानें अर्धचंद्राकृति व्यूह रचून युद्धास आरंभ केला. 'जंग फार निकराचा झाला. तोफेच्या कामावर स्वतः नानासाहेब व बाळासाहेब जिवाची परवा न करतां मेहनत करीत होते. वीरांस श्वास सोडण्यासुद्धां फुरसत नव्हती. युद्ध दहा दिवस चाललें. उभय पक्षांकडील बहुत लोक मरण पावले. शेवटीं पुरुषप्रयत्न निष्फळ, दैवबळ प्रधान होऊन अकरावे दिवशीं एकाएकीं वारा फिरला. धुळीनें व धुरानें नेत्र भरून गेले. गोरे लोकांनीं मोर्च्यांतून तोफा बाहेर ओढून पुढें चाल केली व काळे लोक भयातुर होऊन दशदिशा पळत सुटले. इतक्यांत नानासाहेब व रावसाहेब भरधांव घोडे टाकीत तेथें आले आणि बाळासाहेबास विनंति केली कीं, युद्धाची शिकस्त झाली; परंतु ईश्वरानें यश दिलें नाहीं. तरी येथें विनाकारण रांडमरणानें मरून जावें त्यापेक्षां येथून पळून जाऊन पुन्हां उद्योग करून सैन्य जमवूं व शत्रूस लढाई देऊं.' सायंकाळीं त्रिवर्ग राजबिंडे फौजेसह बिठूरला आले. नानासाहेब तेथील मंडळींना उद्देशून, श्वास सोडून, हरहर शब्दाचा उच्चार करून बोलले कीं, 'आजपर्यंत हिंदुधर्माकरितां यत्न केला तो व्यर्थ जाऊन आमचे जीविताचीहि आशा आम्हीं सोडली आहे!'

२७ जुलैला कानपूर इंग्रजांनीं जिंकलें. तेथें बंडखोरांची व नागरिकांची बेगुमानपणें कत्तल करून १६ ऑगस्टला त्यांनीं बिठूरवर हल्ला केला.

नानासाहेबाचा संपत्तीनें भरलेला वाडा लुटून त्यास शेवटीं अग्नि लावून दिला. शहरचे तट व दरवाजे पाडून टाकले. राममंदिर सुरेख होतें तें पाडून मूर्तिसुद्धां ठेविल्या नाहींत. बागांच्या भिंती पाडून उध्वस्त करून टाकिल्या. श्रीमंत बाजीरावसाहेबांनीं सरस्वतेश्वर सांबाचें देवालय लाखों रुपये खर्च करून संगमरवरी दगडाचें गंगातटीं बांधिलें होतें तें पाडून, शिवलिंग काढून टाकून संगमरवरी दगड खणून नेले व देवळाचा मागमूसहि ठेविला नाहीं.' खुद्द नानासाहेब इंग्रज येण्यापूर्वीं निरुपाय होऊन बायकामाणसांना घेऊन गंगापार झाले व फत्तेपुरास येऊन चौधरी भोपाळसिंगाच्या साहाय्यानें, लखनौच्या बेगमेच्या आश्रयाला राहिले. मध्यंतरीं तात्या टोपेस ग्वाल्हेरला पाठवून कुमक मिळविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला.

यानंतर इंग्रजांचा सेनापति सर कॉलिन कँबेल नानासाहेबाच्या समाचाराला निघाला. कँबेलजवळ सैन्य भारी होतें व दारुगोळाहि भरपूर होता. नानासाहेब, लखनौची बेगम, फैजाबादचा मौलवी इत्यादींनीं कँबेलच्या सैन्याशीं अनेक लढाया दिल्या; पण त्या सर्वांत त्यांना हार खावी लागली. रावसाहेब व तात्या टोपे यांच्यावर लढाईचा भार सोंपवून नानासाहेबांनीं बायकामुलांना घेऊन नेपाळांत प्रवेश केला. नेपाळांत डिसेंबर १८५८ अखेर रापती नदीवर इंग्रजांशीं त्यांची एकदां चकमक उडाली; पण येथें निभाव न लागून ते अरण्यांत शिरले. नेपाळच्या जंगबहादुरानें मदत करण्याचें नाकारल्यानें त्यांचा धीर अगदीं खचून गेला. निराशेच्या याहि अवस्थेंत होप ग्रँटला पाठविलेल्या एका पत्रांत त्यांनीं पुढील बाणेदार उद्‌गार काढले. 'पुणें व सातारा ही जहागीर परत मिळाल्याशिवाय आम्ही शस्त्रें खालीं ठेवणार नाहीं! हिंदुस्थानचें राज्य गिळंकृत करून उलट मलाच बंडखोर ठरविण्याचा इंग्रजांना काय अधिकार आहे?' पुढें इंग्रजांनीं माफीचा जाहीरनामा काढला. याचा फायदा घेऊन नानासाहेबाचे कित्येक सैनिक शस्त्रें टाकून पळून गेले. नानासाहेबाची प्रकृतीहि

पराभवानें व धांवपळीनें बिघडत चालली. त्यांना ज्वर येऊं लागला. इंग्रजांनीं नानासाहेबाला पकडून देण्यासाठीं एक लाख रुपयांचें बक्षीस लावलें होतें! पण तें बक्षीस वांझ ठरलें. देवखरी येथील जंगलांत नानासाहेब ऑक्टोबर १८५९ च्या अखेरीस हिंवतापानें वारले. त्यांच्या नातेवाइकांनीं त्यांना अग्निसंस्कार दिला व क्रियाकर्म यथासांग पार पाडलें. अशा रीतीनें फिरंग्यांशीं लढतां लढतां नानासाहेबांनीं आपला देह नेपाळच्या स्वतंत्र हिंदु राज्यांत ठेवला! पेन्शनीच्या निमित्तानें कां होईना, पण नानासाहेब उघडउघड क्रांतिकारकांचे नेते झाले व आपलें उर्वरित आयुष्य त्यांनीं इंग्रजांशीं लढण्यांत खर्ची घातलें. नानासाहेबाचा सुखासीन देह अखेर संग्रामांत पडला! त्यांच्या देहांतून ज्या वेळीं प्राण निघून गेला असेल त्या वेळीं त्यांना, खरोखर देहाचें सार्थक झाल्याचें समाधान झालें असेल! नानासाहेबांच्या शेवटच्या श्वासाचा एकच अर्थ संभवतो आणि तो हा कीं, 'राज्यनाशाचें पित्यांचें पातक मीं माझ्या वीरमरणानें धुऊन टाकलें आहे!'

• • •

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ...
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नों: दि: ....................

# अजिमुल्लाखान



सत्तावनी क्रांतियुद्धांत अजिमुल्लाखानाच्या कामगिरीला फार महत्त्व आहे. अजिमुल्ला ही एक अजब चीज किंवा वल्ली होती. अजिमुल्ला हा मूळचा एक सामान्य मुसलमान माणूस; पण संधि मिळतांच त्याच्या अंगच्या सुप्त गुणांना वाचा फुटली व कर्तृत्वाला पंख फुटून त्यानें खरोखर सागरोड्डाण केलें व पुढें प्रत्यक्ष रणमस्तीचीहि मजा लुटली.

कोण हा अजिमुल्ला ? कुठला ? कुठला कुणास ठाऊक ! त्याच्या पूर्व-चरित्राविषयीं इतकीच माहिती कळते कीं, आरंभीं तो इंग्रजसाहेबाच्या घरीं खानसामा म्हणजे बटलर होता. साहेबाच्या संगतीनें तो हळूहळू इंग्रजी व फ्रेंच भाषा शिकला व नंतर ती नोकरी सोडून कानपूरच्या एका शाळेंत त्यानें नांव घातलें. पुढें याच शाळेंत तो मास्तर झाला. शंभर वर्षां-पूर्वीं इंग्रजी लिहितां वाचतां येणारा मनुष्य विद्वान् म्हणून गणला जाई. अजिमुल्लाखानाची ही ‘ विद्वत्ता ’ हळूहळू नानासाहेब पेशव्यांच्या कानीं

गेली व त्यांनीं त्याला आपल्या नोकरींत घेतलें. नानासाहेबासारख्या हिंदु-धर्माभिमानी नेत्याचा विश्वास संपादन करणें ही गोष्ट सामान्य नाहीं ! अजिमुल्लाखान हा धर्मानें मुसलमान; पण त्यानें आपल्या चतुर बोलण्यानें व मोहक व्यक्तिमत्त्वानें नानासाहेबावर छाप पाडली. इतकी कीं, १८५६ सालीं पेन्शनीचा प्रश्न धसाला लावण्यासाठीं नानासाहेबानें अजिमुल्ला-लाच वकील म्हणून लंडनला पाठविलें !

नानासाहेबाचें वकीलपत्र घेऊन अजिमुल्लाखानानें लंडनची वारी केली व तेथें बीडन नांवाच्या वकीलाच्या मदतीनें कोर्ट ऑफ डायरेक्टरापुढें त्यानें आपल्या धन्याची बाजू मांडली; पण या कामीं त्याला यश आलें नाहीं. आतां पुढें काय करायचें? लगेच परत फिरायचें? आणि हें अपयशी तोंड धन्याला दाखवायचें ? नाहीं ! अजिमुल्ला इतका लेचापेचा व कमकुवत दिलाचा मनुष्य नव्हता. इंग्रजांनीं पेन्शन देण्यास साफ नकार दिला काय ? ठीक. आतां इंग्रजांनाच हिंदुस्थानांतून घालवून देण्याच्या मार्गाला लागलें पाहिजे; पण हा मार्ग कोणता ? इंग्रजांचें बळ कशांत आहे ? सामर्थ्यांत. मग इथें राहून व परत जातांना पाहूंच या एकदां हें सामर्थ्य किती आहे तें !

अजिमुल्लाचें व्यक्तिमत्त्व मोठें आकर्षक होतें. त्याचा वर्ण तांबूस होता, अंगकाठी सडपातळ होती, चेहरा सुस्वरूप होता व बोलण्याचालण्याची रीत ऐटदार होती. इंग्रजी व फ्रेंच तो सफाईनें बोले व त्या बोलण्यांत एक प्रकारचा मिस्कीलपणा किंबहुना थट्टेखोरपणाहि होता. उंची पोषाख करून व हातांत हिऱ्याच्या अंगठ्या घालून तो लंडनच्या रस्त्यांतून फिरे व मोठमोठ्या इंग्रज कुटुंबांशीं ओळखीपाळखी करून त्यांच्यांत मिसळे. लंडनमधील राज-कीय कामगिरी संपल्यावर तेथें तो जो राहिला तो निव्वळ चैनी व विलास भोगण्यासाठीं नव्हे; तर बड्याबड्या इंग्रज स्त्रीपुरुषांत मिसळून त्यानें इंग्लंडचें सामर्थ्य अजमाविलें. लंडनच्या मुक्कामांत अनेक बड्या घराण्यांतील इंग्लिश स्त्रिया अजिमुल्लाखानावर भाळल्या होत्या. अजिमुल्लाचा

मुसलमानी उंची पेहराव व त्याचें मोहक व्यक्तित्व पाहून अनेक इंग्रज स्त्री-पुरुषांनां तो एकादा 'नवाब' च वाटे. एक प्रकारचें गूढ आकर्षण या नवाबानें लंडनच्या समाजांत निर्माण केलें होतें. इतकें कीं, कित्येक इंग्रज स्त्रिया त्याला चोरून प्रेमपत्रें पाठवीत. तो हिंदुस्थानांत आल्यावरसुद्धां! कानपूर जिंकल्यानंतर इंग्रजांनीं जेव्हां विठूरचा नाश केला तेव्हां इंग्लिश प्रियतमांनीं अजिमुल्लाला पाठविलेलीं कांहीं पत्रें हॅवलॉकला सांपडलीं असें म्हणतात.

लंडनहून परत येतांना माल्टा येथें थांबून अजिमुल्ला क्रिमियांत गेला! या वेळीं क्रिमियांत इंग्लंड व रशिया यांची लढाई सुरू होती. लंडन टाइम्सचा बातमीदार वुल्यम रसेल हाहि या वेळीं रणक्षेत्राचें निरीक्षण करण्यासाठीं क्रिमियांत गेला होता. कॉन्स्टॉटिनोपल येथें या दोघांची गांठ पडून ओळख झाली. रसेलनें आपल्या युद्धरूप दैनंदिनींत अजिमुल्लाखानाचें वर्णन दिलें आहे. या वर्णनावरून अजिमुल्ला हा रणभूमि पहाण्यासाठीं मुद्दामच आला होता असें दिसतें. रशियन गोलंदाजी पहाण्यासाठीं एके संध्याकाळीं अजिमुल्ला एका टेकडावर जाऊन उभा राहिला. या वेळीं एक गोळा धडाडधूम आवाज करीत त्याच्या अगदीं नजीक येऊन पडला; पण हा बहादर डगमगला नाहीं कीं घाबरला नाहीं; तर जवळच्या एका कबरस्तानाच्या भिंतीआड लपून तो गोलंदाजी पहातच राहिला. रशियन गोलंदाजांनीं इंग्रजांची केलेली दाणादाण बघून मनांतून तो खदखदत होता. रसेलशीं गप्पा मारतांना एकदां तो म्हणाला, 'लंडनमध्यें स्त्रियांना फार स्वातंत्र्य बुवा. इतकें स्वातंत्र्य उपयोगाचें नाहीं. आमच्याइकडल्याप्रमाणें त्यांना नजरकैदेंतच ठेवलें पाहिजे. नाहींतर पतंगाच्या दिव्यावरील प्रीती-प्रमाणें त्या आपला सर्वनाश करून घेतील!' जेवण्याखाण्यावरून रसेलला तो एकदां म्हणाला, 'अहो, जेवणाचं काय घेऊन बसलां आहांत? कसला धर्म अन् कसलं काय! मला कोणताच धर्म नाहीं. सर्व धर्म सारखे आहेत मला.' रात्रीं जेवणानंतर रसेल आपल्या तंबूंत येतो तों त्याला अजिमुल्ला गाढ

झोंपी गेलेला दिसला. कुठें? तर, रसेलच्याच बिछान्यावर! आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं रसेल उठून पहातो तों काय? अजिमुल्ला आहे कुठें? टेबलावर अजिमुल्लाच्या सहीची एक चिठ्ठी तेवढी सांपडली. 'पाहुणचाराबद्दल आभार, आतां येतों. गुड मॉर्निंग!' अजिमुल्लानें मायदेशीं प्रस्थान ठेवलें. येतांना तुर्कस्तान व अफगाणिस्तान या देशांना भेटी देऊन भारतीय क्रांतियुद्धाला सहानुभूति मिळविण्याचा त्यानें यत्न केला.

अजिमुल्लाचें यानंतर दर्शन होतें तें कानपूरच्या लढाईचे प्रसंगीं. कलेक्टरच्या बोलावण्यावरून नानासाहेब फौजफांटा घेऊन २० मेच्या सुमारास कानपूरला आले व नवाबगंजांत राहून इंग्रजांच्या खजिन्याचें रक्षण करूं लागले. या ठिकाणीं कानपूरचा क्रांतिकारक पुढारी सुभेदार टिकासिंग यानें त्यांच्याशीं गुप्त वाटाघाटी केल्या. जूनच्या आरंभीं नानासाहेब बाळासाहेब व अजिमुल्ला गंगेच्या कांठीं गेले व नावेंत बसून टिकासिंगादि नेत्यांबरोबर त्यांनीं उठावणीची योजना आंखली.कानपूरच्या शिपायांनीं प्रत्यक्ष उठाव ५ जूनला केला. खजिना लुटून त्यांनीं दिल्लीचा रस्ता धरला. पांचसहा मैल गेल्यावर रात्र पडली म्हणून नानासाहेबांनीं त्यांना थोपवून धरलें. येथिल मुक्कामांत अजिमुल्ला नानासाहेबांना म्हणाला, 'तुम्ही दिल्लीला जाण्याचा बेत सोडून द्या. दिल्लीच्या दरबारांत तुमचें वजन राहाणार नाहीं. तुम्हांला तेथें बादशाहाचें अंकित म्हणून राहावें लागेल. त्यापेक्षां कानपूरला परतून इंग्रजांशीं लढाई देऊं. इंग्रज कमजोर झाले आहेत. त्यांचा पराभव करून तुम्ही स्वतंत्रपणें राज्यकारभाराची धुरा घ्या. परत फिरलांत तर येथील शिपाईहि बहादुरी गाजवून तुम्हांला डोक्यावर घेतील!' अजिमुल्लाच्या या उत्तेजक बोलण्याचा नानासाहेबांवर परिणाम झाला. फौजेला परत फिरवून ते कानपुरांत आले व इंग्रजांशीं लढण्यास सिद्ध झाले.

कानपूरला इंग्रजांच्या छावणीवर क्रांतिकारक फौजेनें ६ जूनला हल्लयास आरंभ केला. छावणीभोंवतीं खंदक खणून चार फूट उंचीची एक तटबंदी,

इंग्रजांनीं उभारलेली होती व तिच्यावर तोफा डागलेल्या होत्या. युद्धाला तोंड लागण्यापूर्वी एक दिवस अजिमुल्लानें इंग्रजांच्या छावणीची पहाणी केली. तटबंदीजवळ असणाऱ्या लेफ्टनंट डॅनियलची थट्टा करण्याची त्याला उर्मी आली. डॅनियलला अजिमुल्लानें विचारलें, 'काय साहेब, या तटबंदीचें नांव तरी काय?' या उपरोधिक प्रश्नाला डॅनियल काय उत्तर देणार! तो म्हणाला, 'तटबंदीचें नांव मलासुद्धां माहीत नाहीं!' यावर अजिमुल्लानें हंसत हंसत टोमणा मारला 'मग असं करा, तुम्ही या तटबंदीला पडेल तटबंदी म्हणत जा!'

कानपूरची लढाई ६ ते २६ जूनपर्यंत चालू होती. क्रांतिकारकांनीं इंग्रजांची चोहोंबाजूंनीं नाकेबंदी करून अविरत तोफांचा मारा केल्यामुळें इंग्रज सेनापतीनें २५ जूनला तहाचें निशाण उभारलें. यानंतर नानासाहेबांनीं गोलंदाजी आवरती घेण्याची आज्ञा देऊन अजिमुल्लाला पुढील पत्र इंग्रजांकडे पाठविण्यास सांगितलें. 'महाराणी व्हिक्टोरियाच्या प्रजाजनांनो, तुमच्यापैकीं ज्या कोणाचा डलहौसीच्या कृत्यांशीं संबंध नसेल व जे शस्त्रें खालीं ठेवण्यास सिद्ध असतील त्यांना अलाहाबादला सुखरूपपणें जातां येईल.' हें पत्र अजिमुल्लाखानाच्या हातचें होतें व तें एका इंग्रज स्त्रीकैद्याबरोबर पाठविण्यांत आलें. पत्रांतील अटी मान्य करून जीव बचावण्याशिवाय इंग्रजांना गत्यंतरच नव्हतें. जनरल व्हीलरचा होकार येतांच नानासाहेबानें लढाई थांबविली व तात्या टोपेला इंग्रजांच्या जाण्याची व्यवस्था करण्यास सांगितलें.

गंगेच्या सतीचौरा घाटावर २७ जूनला इंग्रज स्त्री-पुरुष व मुलें सकाळीं आलीं व तेथें तयार ठेवलेल्या ४० नावांत बसलीं; पण त्यांचें पाऊल नावांत पडतें न पडतें तोंच घाटावर उभ्या असलेल्या क्रांतिकारक सैन्यानें त्यांच्यावर अचानक गोळीबार केला व पात्रांत उड्या टाकून त्यांनीं शेंकडों इंग्रजांची अमानुष कत्तल केली. या कत्तलींतून सुमारें १२५ स्त्रिया व मुलें वांचलीं.

त्यांना कैद करून 'बिबिघर' नांवाच्या इमारतींत ठेवण्यांत आलें. कत्तलीचे-वेळीं घाटावरील देवळाजवळ तात्या टोपे, अजिमुल्ला, टिकासिंग इत्यादि नेते उपस्थित होते. त्यांनीं उघड्या डोळ्यांनीं कत्तल पाहिली ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. ही कत्तल क्रांतिकारकांनीं कोणत्या मनःस्थितींत केली हा प्रश्न निराळा; तथापि आश्वासन दिलेल्या निःशस्त्र इंग्रज स्त्री-पुरुषांवर सैन्यानें गोळीबार केला त्या वेळीं वरील त्रयींनें अत्याचार आंवरण्याचा यत्न केला नाहीं ही गोष्ट खरी !

कानपूरला इंग्रज बायकामुलांच्या दोनदां कत्तली झाल्या. २७ला घाटावर व १५ जुलैला बिबिघरांत. या दोन्ही कत्तलींची पार्श्वभूमि लक्षांत घेऊनसुद्धां कत्तली व्हायला नको होत्या असेंच सहृदय मनुष्याला वाटेल. या दोन्ही कत्तलींत अजिमुल्लाखानाचा बराच हात होता. महंमदअल्ली नांवाच्या साक्षी-दारानें पुढें झालेल्या चौकशींत या गुन्ह्याला प्रथम वाचा फोडली. अझिझन नांवाची वेश्या व पांच कसाई यांच्या मदतीनें अजिमुल्लानें ही कत्तल कर-विली व १६ जुलैला सर्वांचीं प्रेतें जवळच्या एका विहिरींत फेकून पुरून टाकण्यांत आलीं. अजिमुल्लाखानाच्या कर्तृत्वाला हा जो कलंक लागला आहे त्यामुळें त्याचें नांव रंगो बापूजीप्रमाणें वंदनीय वाटत नाहीं, तर फक्त स्फूर्तिदायक वाटतें. लंडनला असतांना रंगो बापूजीची नी त्याची गांठभेट झाली होती; पण रंगो बापूजी तो रंगो बापूजी आणि अजिमुल्ला तो आजि-मुल्ला ! दोघांचें ध्येय समान होतें व दोघांचीहि देशभक्ति उत्कट होती. तथापि रंगो बापूजीची संस्कृति व वैचारिक बैठक अजिमुल्लापेक्षां निःसंशय उच्च प्रतीची होती. स्त्रिया व मुलें यांची अमानुष हत्या करणें ही गोष्ट भार-तीय संस्कृतीला मानवणारी नाहीं. अजिमुल्लानें क्रौर्याची भावना मर्यादेबाहेर ताणली व त्यामुळें त्याचें चारित्र शेवटीं कलंकित झालें. कानपूरच्या कत्तली झाल्यानंतर लौकरच इंग्रजांनीं मुसंडी मारली व क्रांतिकारकांना मार देऊन कानपूर पुन्हां जिंकलें. यानंतर अजिमुल्ला कुठें गेला याचा पत्ता लागला नाहीं !

• • •

# राणी लक्ष्मीबाई



झांशीची संग्रामदेवता राणी लक्ष्मीबाई हिचा जन्म काशी पुण्यक्षेत्रीं १९ नोव्हेंबर १८३४ रोजीं झाला. लक्ष्मीबाईचें पाळण्यांतलें नांव मनु होतें. वडिलांचें मोरोपंत ( तांबे ) आणि आईचें भागीरथीबाई. मनु लहान असतांनाच भागीरथीबाई निवर्तल्या. मोरोपंत हे बाजीराव पेशव्याचा भाऊ चिमाजीअप्पा याचे आश्रित होते. चिमाजीच्या निधनानंतर मोरोपंत मनूला घेऊन बिठूर ऊर्फ ब्रह्मावर्त येथें आले. बाजीरावाच्या होमशाळेंत त्यांची नेमणूक झाली. चार वर्षांची मनु उंच उभारणीची, सडपातळ व गौर वर्णाची होती. तिचे डोळे कमळासारखे होते. नाक सरळ असून कपाळ मोठें होतें. चुणचुणीतपणामुळें तिला सारेजण 'छबेली' म्हणत. छबेली बापाची लाडकी असावी यांत नवल नाहीं ; पण तिचा अचपळपणा व पुरुषी खेळांची तिची आवड बघून सर्वांचीच ती प्यारी झाली होती. वडीलधाऱ्यांनीं मनूला मोडी व बालबोध लिहिणें–वाचणें शिकविलें; पण मनु कांहीं विद्या शिकायला जन्मली नव्हती ! ज्योतिषानें सांगितल्याप्रमाणें मनूच्या भाग्यांत राज्ञी-

पद होतें. मिळमिळीत व शोभेचें नव्हे, तर शौर्यानें तळपणारें व रक्तानें न्हाऊन निघणारें! छबेलीला पुरुषी खेळांची भारी आवड. छबेली लहानपणा-पासूनच मर्द स्त्री होती. पेशवे पुत्रांनीं घोड्यावर बसावें, हत्तीवरून झुलावें आणि मीं तेवढ्या फुगड्या खेळाव्यात ! नाहीं. मीहि घोडा फिरवणार, हत्तीवरून फिरणार, बाण मारणार, तलवारीचेहात करणार, बंदुकांचे बायबार काढणार ! ब्रह्मावर्ताच्या शापित वीरभूमींत मनूच्या अंगी वीरश्री चढूं लागली. चंद्रकोरीप्रमाणें वाढणारी मनु भारीच हूडपणा करूं लागली. मनूच्या या वाल्लीला वघून सर्वांना कौतुक वाटे.

मनु बारा वर्षांची झाल्यावर तिच्या विवाहाची मोरोपंतांना चिंता पडली. पंत गरीब होते. मनु हीच काय ती त्यांची लक्ष्मी. कऱ्हाड्यांचीं स्थळं पाहवी तरी कुठें ? जालवणला कुणी नाहीं. गुलसराईंतहि वर नाहीं. ज्योतिषी तर म्हणतात, मनु भाग्यलक्ष्मी होणार ! पण भाग्यवंताला देण्यासाठीं रक्कम तरी कुठून आणूं ? पण अखेर योग जुळून आला. झांशी संस्थानचे आधिपति गंगा-धरराव नेवाळकर यांचें प्रथम कुटुंब निवर्तल्यामुळें त्यांना द्वितीय लग्न कर्तव्य होतें. हस्तेंपरहस्तें त्यांच्या कानांवर मनूची कीर्ति गेली. खुद्द श्रीमंत बाजीराव-साहेबांनीं नेवाळकरांना मनूसाठीं गळ घातली. तिथिनिश्चय झाला. मनूला घेऊन मोरोपंत झांशीला गेले. छबेलीनें ब्रह्मावर्त सोडलें. थाटामाटांत लग्न होऊन मनु 'लक्ष्मी' झाली ! छबेली झांशीची राणी झाली ! मोरोपंत आपल्या मनूच्या घरींच राहूं लागले.

गंगाधरराव १८४२ पासून संस्थानचा कारभार पाहूं लागले होते. इंग्र-जांनीं तह करून संस्थानांत तैनाती फौज टेवलेली होती व तिच्या खर्चा-साठीं २,२७,४५८ रुपये उत्पन्नाचा मुलूख तोडून घेतला होता. संस्थान स्वतंत्र नव्हतें, तर पेशवाईच्या अस्ताबरोबर तें इंग्रजांचें मांडलिक झालेलें होतें. गंगाधरराव राज्यकारभारांत दक्ष व वृत्तीनें धार्मिक होते. १८५० सालीं ते सपत्नीक काशीयात्रेस गेले. १८५१ सालीं लक्ष्मीबाईस पुत्ररत्न झालें.

लक्ष्मीच्या पायगुणानें संस्थानची भरभराट होत होती व आतां तर काय, राज्याला तिनें वारसहि दिला! झांशीचें भाग्य खरोखर उतूं जाऊं लागलें. होय, उतासच जाऊं लागलें! भाग्यलक्ष्मीला दृष्ट लागली! मुलगा तीन महिन्यांचा होतो तोंच काळानें हिरावून नेला! गंगाधररावांना धक्का बसून ते आजारी पडले. नाना तऱ्हेचे औषधोपचार झाले. अनुष्ठानें झालीं. आजारास उतार पडेना. पुत्रसंततीच्या अभावीं श्रीमंत बेचैन झाले. संस्थानचें काय होणार या एकाच चिंतेनें श्रीमंतांना घेरलें. शेवटीं निश्चय करून नेवाळकर घराण्यांतील आनंदराव (दामोदरराव) यास यथाविधि मांडीवर घेतलें तेव्हां कुठें अंतरींच्या वेदना निमाल्या. दत्तविधानाच्या या सोहळ्याला इंग्रजांचे प्रतिनिधि उपस्थित होते. त्यांनीं वरीष्ठांस निवेदनें केलीं; पण गव्हर्नर जनरलकडून हें दत्तविधान नामंजूर झालें. इतकेंच नव्हे, तर औरस संतति नसल्यामुळें गंगाधररावांच्या मृत्यूनंतर (२१-११-१८५३) झांशी संस्थानहि खालसा करून टाकलें (१८५४). जितक्या त्वरेनें झांशीची भाग्यलक्ष्मी अस्मानांत चढली तितक्याच त्वरेनें ती जमीनदोस्त झाली! काळाचा महिमा अतर्क्य असतो हेंच खरें!

संस्थान खालसा झाल्याचा हुकूम येतांच दरबारांत लक्ष्मीबाईनें आर्त किंकाळी फोडली—'नहीं, मेरी झांशी नहीं दूंगी!' इंग्रजसरकारनें देऊं केलेलें पेन्शन राणीनें ठोकरून दिलें. तेजस्विनीचा अवतार धारण करून ती मानिनी राज्यहीन राजवाड्यांत एखाद्या जोगिणीप्रमाणें राहूं लागली. दरम्यान ४ जूनला कानपूरप्रमाणें झांशीच्या हिंदी फौजांनीं इंग्रजांविरुद्ध बंड पुकारलें. खजिना व दारुगोळा लुटणें, आगी लावणें व इंग्रजांची कत्तल करणें हे प्रकार झांशींतहि झाले. इंग्रज स्त्रीपुरुषांनीं किल्ल्याचा आश्रय घेतला; पण क्रांतिकारकांनीं किल्ल्यावर नेटाचा हल्ला करून त्याची नाकेबंदी केली. ८ जूनला इंग्रज शरण आले. बाहेर येतांच क्रांतिकारकांनीं त्यांची सरसहा कत्तल केली. किल्ल्यांत आश्रय घेण्यापूर्वीं इंग्रजांनीं राणीची मदत मागितली

होती; पण राणी त्यांना उघडरीत्या मदत करूं शकत नव्हती. स्वातंत्र्ययुद्धांत उतरलेल्या क्रांतिकारकांविरुद्ध लढणें राणीला शक्यच नव्हतें. ती या प्रसंगीं तटस्थ राहिली. किल्ल्यांतील इंग्रजांना तिनें अन्नसांठा मात्र पुरविला व कित्येक इंग्रज स्त्रियांना आश्रयहि दिला. प्रत्यक्ष कत्तलींत तिचा बिलकूल हात नव्हता. दत्तविधानास मंजुरी मिळून आपलें राज्य मिळण्याची तिला अद्यापही आशा वाटत होती व त्या धोरणानेंच तिनें इंग्रजांशीं शक्य तों मैत्रीचे संबंध ठेवलेले होते; पण इंग्रजांनीं तिला शेवटपर्यंत दाद दिली नाहीं. संकटांत पडतांच मात्र ते तिचा आश्रय मागूं लागले.

झांशींतील इंग्रजी सत्तेचा नाश केल्यानंतर क्रांतिकारक फौज राजवाड्याभोंवतीं गोळा झाली व त्यांनीं घोषणा केली, 'खुल्क खुदाका, मुल्क बादशहाका, अंमल राणी लक्ष्मीबाईका!' राणी बाहेर आली. आपल्या नांवाचा जयजयकार ऐकून तिला भरतें आलें. क्रांतिकारकांना तिनें साद दिली, १ लाख रुपये दिले व आपल्या नांवची द्वाही फिरवून तिनें झांशीचा कारभार हातीं घेतला. बेबंदशाही माजण्यापेक्षां आपला कारभार काय वाईट हेंच तारतम्य राणीनें वापरलें व धोका पत्करून ती राज्यकारभार पाहूं लागली. राजवाड्यावर राणीनें जरीपटक्याबरोबर युनियन जॅकहि फडकत ठेवलें. हेतु हा कीं, इंग्रजांनीं तिला बंडखोर म्हणूं नये. इंग्रजांच्या वतीनें राज्यकारभार पहाणारी प्रतिनिधि ही भूमिका स्वीकारण्यांत राणीनें दूरदृष्टीच वापरली. राणी अंतर्यामीं इंग्रजांची शत्रु बनलेली होती व इंग्रजांच्या दास्यांतून तिला संस्थान मुक्त करायचें होतें हें तर उघडच होतें. राणी वरकरणी इंग्रजांशीं मैत्री दाखवीत होती. मनापासून त्यांची ती मित्र होऊंच शकत नव्हती. राणीला इंग्रजांनीं किती नाना प्रकारें छळलें होतें. राज्य खालसा करणें हा इंग्रजांचा सर्वांत मोठा अन्याय! राणीनें केलेल्या गोहत्येच्या अर्जाला नकार हा दुसरा अन्याय! काशीला केशवपनाला जाण्याची परवानगी नाकारणें हा तिसरा अन्याय आणि मुलाच्या

मुंजीसाठीं शिलकेंतले एक लाख रुपये जामिनाशिवाय न देणें हा चौथा अन्याय! कोणती स्वाभिमानी स्त्री हे अन्याय गिळून मैत्रीसाठीं आपला हात पुढें करील ?

राज्यकारभार हातीं घेतल्यावर राणीला प्रथम दोन अंतर्गत शत्रूंना तोंड द्यावें लागलें. राणीच्या घराण्यांतील पारोळ्याचे सदाशिव नारायण यानें बंड पुकारून संस्थानचा करेरा किल्ला घेतला व स्वतःस राज्याभिषेक करवून झोटिंगशाही माजविली. राणीनें त्वरा करून करेरावर सैन्य पाठविलें व किल्ला जिंकला. सदाशिवराव पळून गेला; पण त्याला कैद करून किल्ल्यांत ठेवण्यांत आलें. दुसरें बंड ओरछाचा नबाब नथेखां यानें केलें. तो स्वतः झांशीवर चालून आला. राणीनें झांशीच्या किल्ल्यावर कडेकोट बंदोबस्त ठेवला. ठाकूर व बुंदेले मंडळींचें साहाय्य घेऊन तिनें दारुगोळ्याचा कारखाना उघडला. जवाहरसिंग कटिलेवाले याचेकडे सेनापतीचीं सूत्रें दिलीं. गुलाम गोषखानाकडे गोलंदाजी सोंपविली व स्वतः पठाणी वेष करून राणी युद्धांत उतरली. उभय पक्षांत तुंबळ युद्ध सुरू झालें. राणीच्या तोफखान्याच्या मारानें नथेखां पराभूत झाला. तहाचें निशाण उभारून नथेखानें युद्धखर्च देऊं केला. राणीनें तो घेऊन नथेखांशीं सख्य केलें. या दोन अंतर्गत बंडाळ्या सोडल्या तर राणीच्या राज्यांत कोणत्याहि प्रकारची आपत्ति आली नाहीं. राणी इंग्रजांच्या वतीनें राज्यकारभार करीत असली तरी तिला इंग्रजांच्या हालचालींची पूर्ण कल्पना होती. आज ना उद्यां इंग्रज सैन्य झांशीवर चालून येणार व आपल्याला त्यांच्याशीं युद्ध करावें लागणार या जाणिवेनेंच ती वागत होती.

झांशी संस्थानचा कारभार राणीनें नऊ महिने केला. इंग्रजांशीं तिनें शक्यतों सलोख्याचें वर्तन ठेवलें होतें. तथापि इंग्रजांना राणीचा कारभार हाच मुळीं बंडखोरीचा वाटला व त्यांनीं योग्य संधि पाहून सर ह्यू रोज या निष्णात सेनापतीला १८५८ च्या मार्चमध्यें झांशीवर पाठविलें व युद्ध

करून संस्थान ताब्यांत घेण्याची आज्ञा दिली. युद्ध प्रत्यक्ष २३ मार्चला सुरू झालें. या युद्धाची भीषणरम्य कथा सांगण्यापूर्वी राणीचा नऊ महिन्यांतील जीवनक्रम आधी समजावून घेऊं.

राणी या नात्यानें लक्ष्मीबाई आदर्श आर्य स्त्री होती. ती रोज पहाटे उठे. कसरत करून खुराक खाई. कधीं घोड्यावरून रपेटी होत, तर कधीं हत्तीवरून फेरफटका होई. राणीला स्नानासाठीं भरपूर व कडकडीत पाणी लागे. आठ दिवसांनीं सुगंधित द्रव्यें पाण्यात टाकून राणी नहात असे. स्नानानंतर पांढरें स्वच्छ चंदेरी पातळ परिधान करून तुळशीची पूजा व्हायची व पुराण श्रवण होई. मग दीडशें मानकरी मुजऱ्याला येत. एकादा आला नाहीं तर लगेच राणीसरकारकडून विचारणा होई. दुपारीं १२ वाजतां भोजन, भोजनोत्तर वामकुक्षी व तदनंतर नजराण्यांची नजर. तीन वाजतां सरकारस्वारी कचेरींत येई. कधीं पुरुषवेषांत तर कधीं स्त्रीवेषांत. पायजमा, जांभळ्या रंगाची वंडी, टोपी, तीवर पागोट्यासारखी वत्ती, कमरेस जरीकाठी दुपेटा व रत्नखचित तलवार हा पुरुषवेष असे. राणीची मूर्ति गौर व उंच होती. हातांत सुवर्णकंकणें—गोठ, गळ्यांत मोत्यांचें पेंढें, बोटांत हिऱ्याची अंगठी, केसांचा बुचडा बांधलेला, पांढरा शालू, पांढरी चोळी हा स्त्रीवेष असे. दरबारच्या खोलींत गादीलोड असे. त्यावर राणी विराजमान होई. खोलीच्या दरवाज्याला सोनेरी मेहरप होती. बाहेर दोन भालदार उभे असत. समोर लक्ष्मणराव दिवाणजी कागदांचें पुडकें घेऊन आदबीनें बसे. पलीकडे सातआठ कारकुन मंडळी बसलेली असत. राणी-सरकार कागदपत्रें वाचवून घेऊन भराभर हुकूम देत. कधीं स्वतःहि लिहून देत. कारभार कडक असे व न्यायदान दक्षतेनें होई. एकादे वेळीं राणी स्वतः छडी घेऊन अपराध्यास शासन करी.

शुक्रवार—मंगळवार राणी सरकार मुलाला घेऊन महालक्ष्मीच्या दर्शनाला जात. या वेळीं स्वारीचा थाट अपूर्व असे. राणी कधीं मेण्यांत

तर कधीं घोड्यावर असे. दाक्षिणेंतून आणलेल्या सुंदर दासी बरोबर असत. डंकानिशाणें समोर झुलत व रणवाद्यें त्यांना साथ देत. स्वारीमागून २०० विलायती लोक व १०० हिंदी स्वार, कारभारी, भिक्षुक इत्यादींचे ताफे असत. प्रसंगविशेषीं बंदुकीचे आवाज होत. सरकारदरबारीं मौल्यवान् पुस्तकांचा संग्रह होता. निरनिराळ्या प्रकारची आश्रित मंडळी असत व त्यांची काळजी जातीनें वाहिली जाई. पुराणिक, गवई, कारागीर यांची हौस पुरविली जाई. कोंकणच्या नाटकमंडळीचे खेळ करवून राणीनें त्यांना उत्तम बिदागी दिली. इतकेंच नव्हे तर प्रयोगासाठीं दरबारी वस्त्रें-भूषणेंहि एकदां वापरायला दिलीं. राणीला अश्वपरीक्षा उत्तम होती. नानासाहेब पेशवे, त्यांचे मेव्हणे बाळासाहेब आपटे व राणी लक्ष्मीबाई हीं तीन माणसें अश्वपरीक्षेसाठीं त्या वेळीं सर्वत्र लोकविश्रुत होतीं. चोर-दरोडेखोरांचा बंदोबस्त राणी दक्षतेनें करी. धर्मकृत्यांना व औदार्याला तर सीमाच नव्हती. राणीच्या राज्यांतून दरिद्री भिक्षुक कधींहि विन्मुख गेला नाहीं. एका भिक्षुकाचें लग्न रकमेसाठी अडलें असतां राणीनें ५०० रु. देऊन बिचाऱ्याचा संसार उभा केला. देवदर्शनाला जात असतां थंडीनें कुडकुडणाऱ्या भिकाऱ्यांचा ताफा एकदां दिसला. लगेच रमणा भरवून प्रत्येक भिकाऱ्यास बंडी, टोपी व घोंगडी देवविली.

इंग्रजांशीं युद्ध सुरू होण्यापूर्वीं राणीनें जय्यत युद्धसिद्धता केली. किल्ल्याचा बंदोबस्त केला. किल्ल्यांत जाण्यापूर्वीं गोमूत्रानें तो आधीं शुद्ध करविला. कारण फिरंग्यांचा त्याला स्पर्श झाला होता. तटांची डागडुजी करविली व नवीन बंदुका, तोफा व दारुगोळ्याचा कारखाना सुरू केला. अन्नसांठ्याची व्यवस्था केली. खंडोगणति चुरमुरे, फुटाणे, तूप, साखर, कणिक, तांदूळ इत्यादि सामग्री जमा करून ठेवली. युद्धखर्चाला रक्कम कमी पडूं नये यासाठीं चांदीचीं मोठमोठीं भांडीं मोडलीं. काल्पीला पेशव्यांकडे पत्रें लिहून त्यांचीहि मदत मागून ठेवली. युद्धाला थोडा अवधि होता. चैत्र

महिना आला. शुक्रवारीं हळदी-कुंकवाचा शेवटचा समारंभ थाटामाटानें साजरा केला. शहरांतील सर्व जातींच्या स्त्रिया बोलावल्या. गोर दिवाण-खान्यांत मांडलेली होती. हळदीकुंकू देण्यास शंभरावर सुवासिनी खपत होत्या. लक्ष्मीबाईचें झांशींतील हें शेवटचेंच हळदीकुंकू होतें. हा समारंभ झाला आणि थोड्याच दिवसांत झांशीचें कुंकू पुसलें गेलें. शांतसौम्य लक्ष्मीबाईला रणचंडीचा अवतार धारण करावा लागला!

२३ मार्चपासून झांशीभोंवतीं इंग्रजांचा वेढा पडला व उभय पक्षांत युद्ध सुरू झालें. इंग्रजांचें सैन्य कवाइती व ताज्या दमाचें असून त्यांचेकडे रण-कुशल सेनापति व समर्थ तोफा होत्या. इंग्रजांच्या तोफखान्याला राणीच्या गोलंदाजांनीं चांगली टक्कर दिली. गुलाम गोषखान व कुंवर खुदाबक्ष या गोलंदाजांनीं तर अपूर्व बहादुरी गाजविली. एका गोलंदाजास राणीनें ८० तोळ्यांचा चांदीचा तोडा नजर केला. युद्ध दिवसेंदिवस निकरावर येऊं लागलें. राणी पेशव्यांच्या सैन्याची वाट पहात होती. मार्चअखेरीस पेशव्यांचे सेनापति तात्या टोपे वीस हजार फौजेनिशीं झांशीजवळ दाखल झाले; पण तात्याच्या सैन्याची पहिली तुकडी पुढें सरसावतांच सर ह्यू रोजनें दोन तुकड्या दोन बाजूंनीं पाठवून त्याला परतवून लावलें. तात्याचें सैन्य माघार घेऊन व तोफा टाकून पळून गेलें. राणी तटावर उभी राहून हा नामुष्कीचा प्रकार पहात होती. तात्याच्या पराभवामुळें इंग्रजांना दुप्पट उत्साह आला व त्यांनीं किल्ल्याच्या तटावर निकराची गोलंदाजी सुरू केली व तटांना शिड्या लावण्याचा यत्न चालविला. राणी स्वतः तटावर चढून आपल्या गोलंदाजांना उत्तेजन देऊं लागली. तिनें आतां हातांत तलवार धारण केली होती. इंग्रजांच्या तोफगोळ्यांनीं बरीच हानि होत होती व शेंकडों माणसेंहि मृत्युमुखीं पडत होतीं. राणीच्या सैन्यांत एक प्रकारें औदा-सिन्य पसरलें. अकराव्या दिवशीं राणीनें स्वतः तलवार उपसली. दुलाजी ठाकुरानें फितुरी करून इंग्रजांना वाटा दाखविल्या. गवताचे भारे लावून

इंग्रज तटावरून किल्ल्यांत शिरले. हातघाईची लढाई सुरू झाली. राणी हत्यारबंद होऊन निवडक दीड हजार फौजेसह इंग्रजांच्या समाचाराला निघाली. फौजेच्या मधोमध उभी राहून ती तलवार फिरवूं लागली. शेंकडों गोऱ्यांना तिनें कंठस्नान घातलें! गोऱ्यांची कत्तल उडवीत राणी आवेशानें पुढें पुढें जात होती तोंच एका वृद्ध सरदारानें विनवणी करून तिला परतविलें. कारण इंग्रजांनीं संगिनी टाकून आतां बंदुका धारण केल्या होत्या.

राणी परत किल्ल्यांत आली. रात्रीं गच्चीवर उभी राहून ती पाहूं लागली तों सारें शहर पेटलेलें दिसलें. ती आग पाहून व लोकांचे आक्रोश—आक्रंदन ऐकून राणीला शोक झाला. तिनें दुःखाश्रु गाळले. दारुगोळा पेटवून ती आत्मघाताला तयार झाली; पण एका वृद्धानें या पापापासून तिला परावृत्त केलें व धीर दिला. वृद्धाची निष्ठा पाहून राणीचें अंतःकरण द्रवलें. त्याच्या पायांना स्पर्श करून राणीनें किल्ला सोडण्याचा निश्चय केला. शत्रूशीं बाहेरून मुकाबला करणें एवढाच तिच्यापुढें मार्ग होता. हत्यारबंद दोनशें स्वार घेऊन राणी किल्ल्याबाहेर निघाली. एका हत्तीवर सर्व संपत्ति लादली होती. वडील मोरोपंत बरोबर होते. निघतेसमयीं सर्वांचा अश्रुपूर्ण नयनांनीं तिनें निरोप घेतला. दासदासींना बक्षिसें दिलीं. राणीनें पुरुषवेष धारण करून अडीच हजार किंमतीच्या पांढऱ्या खंद्या राजरत्नासारख्या घोड्यावर ती आरूढ झाली. अंगांत तारेचें चिलखत घातलें. कमरेस जंबिया व हातीं तलवार घेतली. जवळ एक चांदीचा पेला घेतला. पाठीशीं रेशीमकांठी धोतरानें आठदहा वर्षांच्या दामोदरास बांधलें व 'जयशंकर!' गर्जना करीत उत्तर दरवाज्यानें राणी बाहेर पडली. दुतर्फा उभ्या राहिलेल्या मंडळींनीं राणीला सहस्र मुजरे केले व राणीनेंहि त्यांना अखेरचें वंदन केलें. ४ एप्रिलला ही दुर्दैवी घटना घडली

राणीचा घोडा काल्पीकडे भरधांव निघाला. समय रात्रीचा होता. इंग्रजांनीं तिचा पाठलाग सुरू केला; पण राणी पहातां पहातां दिसेनाशी

झाली. दुसरे दिवशीं उजाडल्यावर एका गांवीं मुक्काम करून राणीनें दामोदराला खाऊं घातलें. इतक्यांत ले. बोकर जवळ आल्याची वर्दी लागली. समशेर उपसून राणीनें घोडा फेंकला. या ठिकाणीं उडालेल्या चकमकींत राणीच्या तलवारीनें बोकर जखमी झाला व झांशीला परतला. राणी काल्पीकडे निघाली. अखंड घोडदौड करीत मध्यरात्रीं ती काल्पीनजीक पोंचली. चोवीस तासांत पोटांत अन्न नव्हतें. वायुवेगानें धांवणारा राणीचा घोडा काल्पीला थांबतांच धाडकन् जमिनीवर कोसळला. नोकरचाकरांनीं शिरा मळून व पाणी पाजून त्याला उभा केला. खुद्द राणीवर या ठिकाणीं नवीनच संकट कोसळलें. पहाटेच्या समयीं राणीस अस्पर्शदशा प्राप्त झाली. राणीसरकार एकवस्त्रा होत्या. लज्जेनें, संकोचानें व दुःखानें त्यांना रडूं कोसळलें. श्रीमंत रावसाहेबास राणीच्या आगमनाची वार्ता कळतांच तात्या टोपेला त्यांनीं बंदोबस्तासाठीं पाठविलें. भांडींकुंडीं, लुगडीं, तंबू इत्यादि सामान घेऊन तात्या राणीकडे गेले. उजाडतांच राणीनें काल्पींत प्रवेश केला. श्रीमंतांची भेट घेतली. भेटींत उभयतांस गहिंवर आला. राणीनें अश्रुपूर्ण नयनांनीं तलवार काढून श्रीमंतांपुढें ठेविली. श्रीमंत भावार्थ समजले व मनांतून खजिल झाले. श्रीमंतांनीं तलवार उचलली व उत्तेजनपर बोलून ती पुन्हा राणीच्या हातांत दिली. राणी आणि तात्या टोपे यांच्यावरच श्रीमंतांनीं यापुढें सर्व भार टाकला.

राणीनें झांशी सोडतांच इंग्रजांनीं किल्ल्यांत व शहरांत प्रवेश केला आणि बंडखोर क्रांतिकारकांची व नागरिकांची अमानुष कत्तल केली. कत्तलीबरोबर लुटालूट व जाळपोळहि केली. राणी लक्ष्मीबाईचे वडील मोरोपंत जखमी होऊन एका गांवीं आश्रय घेऊन राहिले होते; पण तेथील दिवाणानें त्यांना कैद करून इंग्रजांच्या स्वाधीन केलें. इंग्रजांनीं मोरोपंतांना झांशींत आणून राजवाड्यासमोर भर दुपारीं फांशीं दिलें. झांशींत तीन दिवस 'विजन' म्हणजे कत्तल चालू होती! प्रेतांच्या राशी जिकडे तिकडे पडल्या

होत्या. झांशींतील सर्व संपत्ति इंग्रजांनीं धुऊन नेली. महालक्ष्मीचें देवालय लुटलें गेलें, ग्रंथसंपत्ति रस्त्यावर आली, मौल्यवान् सामानाचा लिलांव करण्यांत आला. राणी लक्ष्मीबाई झांशीबाहेर पडतांच झांशीच्या लक्ष्मीला अक्षरशः अवकळा आली !

झांशींत 'इंग्रेजी अंमल' वसवून सर ह्यू रोज क्रांतिकारकांचें केंद्र जें काल्पी—त्या काल्पीकडे २५ एप्रिलला निघाला. वाटेंत कुंचगांवीं क्रांतिकारकांशीं त्याची गांठ पडली. राणी लक्ष्मीबाई या ठिकाणीं स्वतः लढत होती; पण इंग्रजापुढें तिला माघार घ्यावी लागली. यानंतर काल्पीपासून सहा मैलांवर उभय पक्षांत तुंबळ युद्ध झालें. इंग्रज सैन्यावर राणीनें जोरदार हल्ला केला. राणी पठाणी वेषांत घोड्यावर बसून लढत होती. तिचें अंग धुळीनें माखलेलें होतें. पराभव होऊन काल्पीकडे परततांना तहान लागली म्हणून एका विहिरीवर जाते तों जुन्या ओळखीचे वरसईकर गोडसे भट तिला दिसले. भटजीबुवा पाणी काढूं लागतांच राणी घोड्यावरून उतरली व पाणी काढूं लागली. मृण्मय पात्रांतून ओंजळीनें पाणी पिण्याचा तिजवर प्रसंग आला होता. भटजीबुवास राणी म्हणाली, 'मी आतां अर्धा शेर तांदुळाची धणीन. हिंदुधर्माचा अभिमान धरून या कर्मास प्रवृत्त झालें.' राणी येवढें बोलूनच थांबली नाहीं; तर त्या पडत्या काळांतहि भटजीबुवास तिनें वाटखर्चाला कांहीं रुपये दिले व काल्पीला येण्यास सांगितलें.

खुद्द काल्पीला काय झालें? तीन दिवस लढाई होऊन इंग्रजांनीं २४ मे रोजीं काल्पी सर केली. रावसाहेब, तात्या व राणी या त्रयीनें अरण्याचा रस्ता धरला; पण वनवासांत जाण्यासाठीं नव्हे तर आमरणान्त झुंजण्यासाठीं! गोपाळपूरला छावणी पडली व खलबतें झालीं. राणीनें ग्वाल्हेर सर करण्याचा सल्ला दिला. कारण ग्वाल्हेरला बळकट किल्ला होता व शिंदे सरकारचा खजिना व फौज मिळणार होती. राणीचा सल्ला पसंत पडून क्रांतिकारक सेना ग्वाल्हेरकडे निघाली. पूर्वीं एकदां तात्या ग्वाल्हेरला जाऊन तेथील

सैन्यांत फितुरी करून आलेला व होता. मेअखेर पेशव्यांचें सैन्य ग्वाल्हेर-जवळ आलें. रावसाहेबांनीं शिंदे सरकारास स्नेहाचे व मदतीचे निरोप पाठविले; पण जयाजीराव व त्यांचे दिवाण दिनकरराव यांनीं इंग्रजांशीं हातमिळवणी करून उलट पेशव्यांच्या सैन्यावरच हल्ला चढविला. या हल्ल्याला तोंड देण्यासाठीं राणी लक्ष्मीबाई पुढें घुसली व तिनें शिंद्याच्या तोफखान्यावर हल्ला करून तो बंद पाडला. दुसऱ्या बाजूनें तात्या टोपेहि पुढें घुसला. याच वेळीं शिंद्याची फौज फितूर होऊन क्रांतिकारकांना मिळाली. पलायनाशिवाय शिंदे सरकारास मार्ग सांपडेना. शिंदे पळून जातांच क्रांतिकारकांनीं शहरचा व किल्ल्याचा ताबा घेतला. ३ जूनला फुलबागेंत दरबार भरला. राणी नवलखा बागेंत उतरली होती. ती दरबाराला हजर नव्हती. विजयानें धुंद झालेल्या पेशव्यांनीं आनंदोत्सव साजरा केला! अन्नकोट व भोजनें झालीं. राणीला हे प्रकार आवडले नाहींत. पेशव्यांनीं असल्या प्रकारांत निमग्न न होता युद्धसिद्धता केली पाहिजे असें तिचें मत होतें. दुर्दैवानें हें घडलें नाहीं. या गाफीलपणाचा पुढें व्हायचा तोच परिणाम झाला.

४ जूनला काल्पीला ग्वाल्हेरचें वृत्त कळतांच सर ह्यूरोजनें घेतलेली रजा रद्द केली व तो त्वरेनें ग्वाल्हेरकडे निघाला. इंग्रजांचें सैन्य दिसतांच तात्या युद्धसिद्धतेला लागला. १६ व १७ जून रोजीं ग्वाल्हेर शहरांत युद्ध पेटलें. मुरार छावणी इंग्रजांच्या हातीं पडली. १७ जूनला ब्रिगेडियर स्मिथनें चाल केली. राणीनें तोफखान्याच्या साहाय्यानें इंग्रजांची दाणादाण उडविली. १८ जूनला इंग्रजांनीं फुलबागेवर हल्ला चढविला. युद्ध हातघाईवर आलें. अनेक गोऱ्यांचे राणीनें बळी घेतले. इंग्रजांची फळी फोडून राणी बाहेर पडली. ब्रिगेडियर स्मिथनें तिचा पिच्छा पुरविला. विजयाची आशा राणीनें केव्हांच सोडली होती. पळतां पळतां राणीनें रामचंद्रराव देशमुखास बजावून ठेवलें कीं, 'मी पडलें तर माझ्या देहाला फिरंग्यांचा स्पर्श होऊं देऊं

नका!' राणी थोडी पुढें जाते तों सावलीसारखी सदोदित पाठीमागें असणारी तिची मंदार दासी शत्रूची गोळी लागून खालीं पडली. आणखी पुढें जाते तों ओढा आडवा आला. आतां काय करायचें? शत्रु तर पाठीवर येऊन ठेपला— ओढ्यावरून घोडा फेकणें किंवा मागें वळून मरण पत्करणें! पण असं रांडमरण कां पत्करायचं? 'बचेंगे तो और भी लडेंगे!' राणीनें लगाम ओढून घोड्याला टांच मारली; पण घोडा थिथरला. उडी घेईना. राणीच्या दुर्दैवानें या वेळीं तिचा नेहमींचा घोडा नव्हता, तर नवखा होता. राणीच्या जिवाचं मोल त्या बिचाऱ्याला ठाऊक नव्हतं. हें घोडं अडखळलं! यमदूत राणीच्या अगदीं जवळ येऊन पोंचले. इंग्रजांच्या हुजर्स पलटणींतील एका स्वारानें राणीच्या गळ्यांतील कंठ्याच्या लोभानें तिच्या डोक्यावर तलवारीचा घाव घातला. आणि हाय! त्या घावासरशी राणीच्या डोक्याचा उजवीकडील भाग छिन्नविछिन्न झाला व डोळा बाहेर आला. छातींतहि एक घाव बसून रक्त वाहूं लागलें. राणी घोड्यावरून खालीं आली. ती कोण होती तें त्या हुजर स्वारांना ठाऊक नव्हतें.त्यांची तोंडं वळतांच रामचंद्रराव देशमुख घाईनें पुढें झाला व राणीला उचलून त्यानें जवळच्या एका पर्णकुटींत नेलें. पर्णकुटी गंगादासबावाची होती. राणी रक्तानें न्हाऊन निघाली होती. शरिरांत थोडी धुगधुगी होती. नेत्र पैलतीराला लागले होते. राणीची शेवटची इच्छा काय असणार? 'ज्याच्यासाठीं रणांत पडलें त्या माझ्या दामोदराला, झांशीच्या वारसाला एकदां डोळे भरून पाहूं द्या! आणा त्याला लवकर!' छोटा दामोदर जवळ येतांच राणीनें त्याला नेत्रांत साठवून घेतलें आणि मग आपलेंहि नेत्र मिटून घेतलें! राणीला तिची प्राणप्रिय झांशी आतां कधींहि दिसणार नव्हती! पर्णकुटीजवळ एक गवताची गंजी होती. ती पेटवून रामचंद्ररावानें राणीच्या अनमोल देहास अग्नि दिला!

'अशा रीतीनें लक्ष्मी लढली. साधी यःकश्चित् स्त्री, वयानें बावीस-

तेवीस वर्षांचीहि असेल—नसेल ! पण गुलाबासारखी मृदुमोहक, चालण्या-संवरण्यांतहि अतिशय गोड, नि चारित्र्यानें अतिशय विशुद्ध—अशा या अबलेनें, सहसा पुरुषांमध्येंहि क्वचित् दिसून येणारें संघटनाचातुर्य प्रकट करून आपल्या प्रजेचीं मनें आकर्षून घेतलीं. स्वदेशभक्तीची दिव्य ज्योत तर तिच्या अंतःकरणांत सदोदितच तेवत होती. स्वदेशाची प्रतिष्ठा मिरविण्यांत जशी ती अग्रेसर होती तशी रणपांडित्यांतहि ती कुणाला हात धरूं देणारी नव्हती. अशा तऱ्हेची ही देवतातुल्य स्त्री, कन्या नी राज्ञी म्हणून लाभण्याचें भाग्य क्वचित् एकाद्याच राष्ट्राच्या वाट्याला आलें असेल ! हें भाग्य इंग्लंडलाहि अद्याप लाभलेलें नाहीं !'

मृत्युसमयीं राणीचें वय अवघें साडेतेवीस होतें ! राणीनें रणांगणांत ज्या ठिकाणीं आपला देह ठेवला त्या ठिकाणीं आतां तिचें स्मारक उभारलें आहे. राणीच्या वृंदावनावर कविवर्य कै. तांबे यांच्या पुढील काव्यपंक्ति कोरलेल्या आहेत—

**कडकडा कडाडे बिजली**
**शत्रूंची लष्करें थिजलीं**
**मग कीर्तिरूपें उरली**
**ती पराक्रमाची ज्योत, मालवे इथें झांशीवाली.**

● ● ●



# कुंवरसिंह

बिहार प्रांतांत क्रांतियुद्धाचा डोंब ज्या महाभागानें पेटविला त्याचें नांव कुंवरसिंह ! ऐंशीं वर्षांच्या या वृद्ध वीरानें एक वर्षभर बिहार प्रांतांत इंग्रजांना सळो कीं पळो करून सोडलें. जखमी होऊन तापानें आजारी न पडता तर या वृद्धयुव्यानें गनिमीयुद्ध खेळून इंग्रजी सत्ता बिहारमधून तरी समूळ उखडून टाकली असती ! पण कुंवरसिंहाचा एका लढाईंत शस्त्रधारी असा हातच निकामी झाला व म्हणून सरतेशेवटीं सामर्थ्यवान् इंग्रजांपुढें त्याला हात टेकावे लागले. छेः छेः, हात नाहींच टेकले या सिंहानें ! इंग्रजांनीं उध्वस्त केलेल्या राजधानींत म्हणजे जगदीशपुरांत कुंवरसिंहानें प्रवेश केला व मगच त्या नरसिंहानें मृत्यूच्या मांडीवर मान टेकली ! कुंवरसिंहाला इंग्रजी सत्तेचा विनाश बघतां आला नाहीं ; पण त्यानें आपले डोळे मिटले ते मात्र स्वतंत्रतेच्या वातावरणांत !

कुंवरसिंह हा रजपुताचा बेटा होता. क्षात्रधर्माचें रक्त त्याच्या नसानसांतून

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................. वि: ..................
क्रमांक .................. नों. दि. ..................



खेळत राहावें यांत नवल नाहीं. १७७८ च्या सुमारास विष्णुपूर्व येथें त्याचा जन्म झाला. त्याच्या वडिलांचें नांव शहाजादासिंह. कुंवरला आणखी तीन भाऊ होते. त्यांचीं नांवें दयाळसिंह, राजपतिसिंह व अमरसिंह अशीं होतीं. हे तिघे भाऊ कुंवरप्रमाणेंच शूर होते.व त्याच्या आज्ञेंत वागणारे होते.तिघांचा महान् दोष एवढाच कीं, हे तिघे भाऊ उधळे निघाले व त्यांनीं कर्जाचे डोंगर उभारले. कुंवरसिंहाच्या वांट्याला जमीनदारीचा मोठा हिस्सा आलेला होता. या हिश्याची व्यवस्था त्यानें चांगली ठेवलेली होती. जगदीशपूरची कुंवरसिंहाची जहागिरी म्हणजे खरोखरच एक नमुनेदार चीज होती. जहागिरदार म्हटला कीं, तो धनलोभी, स्वार्थी व गोरगरिबांना नागवणारा एक अनीतिमान् अरेराव माणूस अशी सर्वसाधारणपणें कल्पना असते; पण सगळेच जमीनदार-जहागीरदार एका मापानें मोजणें न्यायाचें नव्हे. कुंवरसिंह हा एक असा जहागीरदार होता कीं, ज्याच्या चारित्र्याविषयीं सत्तावन सालीं साऱ्या बिहारांत आदर वसत होता. कुंवरसिंह जगदीशपूरच्या आपल्या टोलेजंग वाड्यांत राहात असे. त्याचा हा वाडा म्हणजे त्या काळीं बिहारी जनतेचें एक आश्रयस्थान झालें होतें. कुंवरसिंह युद्धकलेंत निष्णात होताच होता; पण एवढ्या एका कलेमुळें मनुष्य कांहीं लोकादरास पात्र होत नाहीं. कुंवर जसा शूर तसाच मोठा परोपकारी, विचारी व दानतीचा गृहस्थ होता. धर्मावर त्याची प्रगाढ श्रद्धा होती. शिवाचा तो भक्त होता. स्वकीयांप्रमाणें तो परक्यांशीं म्हणजे इंग्रज लोकांशींहि सामोपचारानें वागत असे; पण कंपनी सरकारचीं शंभर वर्षें भरत आलीं होतीं म्हणून कुंवरसिंहासारख्या वृद्ध व मातबर जहागिरदाराला डिवचण्याची इंग्रजांना दुर्बुद्धि झाली. एकापरीनें ही दुर्बुद्धि इष्टापत्तीच ठरली. इंग्रजांच्या जाचामुळें कुंवरसिंह चवताळून उठला व त्यानें क्षात्रधर्माची शर्थ करून मदोन्मत्त कंपनी सरकारची हड्डी नरम केली! जहागीरदार या नात्यानें स्वस्थ पहुडलेला कुंवरसिंह ‘ गोऱ्यां ’ च्या जाच्यामुळें खडबडून उठला व आपल्या पराक्रमानें त्यानें सारा

बिहार प्रांत गर्जून सोडला ! सिंह म्हातारा झाला तरी तो मृत जनावराचीं हाडं चघळत बसत नाहीं तर जिवंत रक्तानेंच त्याची तृप्ति होते. कुंवरसिंहानें वृद्धापकाळींसुद्धां परतंत्रतेचे तट फोडून आपल्या गोऱ्या शत्रूंवर उडी घेतली व आमरणान्त त्यांच्याशीं झुंज दिली !

वृद्धापकाळीं कुंवरसिंहानें शस्त्र कां हाती घेतलें ? इंग्रजांनींच त्याच्यावर हा प्रसंग आणला ! सत्तावनच्या हिंदी सैन्यांत अनेक कारणास्तव असंतोष पसरलेला होता. जहागिरदारांसारखा वरिष्ठ वर्ग व सर्वसामान्य जनताहि कंपनी सरकारच्या कारभारावर रुष्ट झाली होती. कित्येक भागांत सैन्य इंग्रजांविरुद्ध बंड करून उठलें आणि त्या बंडाचें लोण आतां बिहार प्रांतांत पोंचलें होतें. बिहार प्रांतांत त्या वेळीं सहा जिल्हे होते. या सहा जिल्ह्यांना मिळून एक कमिशनर असे. प्रांताचें मुख्य ठाणें दानापूर येथें होतें. या ठिकाणीं ३ हिंदी व १ गोरी पलटण आणि शिवाय तोफखाना इतकें सैन्य-दळ होतें. शहाबाद जिल्ह्याचें ठाणें आरा. येथें तुरुंग व खजिना होता. ठिकठिकाणच्या बंडाच्या वार्ता ऐकून व प्रांतांतील असंतोषाची कल्पना येऊन बिहारमधील इंग्रज अधिकारी सावध झाले होते. कमिशनर टेलर यानें संशयित बंडखोरांना अटकेंत टाकण्याचा व कित्येकांस फांशी देण्याचा धडाका सुरू केला. कारण न देतां आधीं भेटीला बोलवायचे व मग त्याला बेड्या ठोकून कैदेंत ठेवायचें हे प्रकार अनेक मौलवींच्या बाबतींत झाले. टेलरच्या अरेरावी कारभारामुळें बिहार संत्रस्त झाला. आरा येथील तुरुंगांत मडक्यांवरून तक्रारी झाल्या व त्यांचें रूपांतर दंगलींत झालें. कैद्यांनीं केलेली ही दंगल शमविण्यासाठीं व त्यांची समजूत पाडण्यासाठीं मॅजिस्ट्रेटनें कुंवरसिंहाला पाचारण केलें. कुंवरसिंहाच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभावच येवढा मोठा होता कीं, तो आल्याला येतांच तुरुंगांत शांतता निर्माण झाली ; पण इंग्रज हे असे कृतघ्न कीं, काम होतांच कुंवरसिंहाचे उपकार ते विसरले ! नुसते विसरले नाहींत तर खुद्द कुंवरसिंहालाच जाळ्यांत अडकविण्याचा त्यांनीं बेत केला !

कुंवरसिंह म्हणजे बिहारी जनतेच्या सामर्थ्याचें प्रतीक होतें. इंग्रजांनीं ही गोष्ट हेरली होती. कर्जबाजारी झालेल्या बंधूंवर कोर्टांत जेव्हां खटले सुरू झाले तेव्हां कुंवरसिंह पुढें झाला व त्यानें कर्जफेडीचा डोंगर स्वशिरावर घेतला; पण सावकार तगादे करूं लागले व इंग्रज अंमलदार त्यांना उत्तेजन देऊं लागले. ठराविक मुदतींत कर्ज फिटेना तेव्हां कुंवरसिंहावर नोटिसा निघाल्या व मालमत्ता जप्त करण्यापर्यंत कारवाया सुरू झाल्या. अशा परिस्थितींत चुगलखोरांनीं कागाळ्या करून इंग्रज अंमलदारांचीं मनेंहि कुंवरसिंहाविषयीं कलुषित केली. असंतुष्ट सैनिकांचा कुंवरसिंह पाठपुरावा करीत आहे अशा प्रकारच्या या कागाळ्या होत्या. जनमनावर पकड असणारा कुंवरसिंह जर बंडखोरांना मिळाला तर कठीण प्रसंग ओढवेल हें इंग्रज जाणून होते आणि म्हणून एक दिवस कमिशनरनें कुंवरसिंहाला पाटण्याला भेटीसाठीं बोलावलें. यापूर्वीं ३ जुलै १८५७ रोजीं पाटणा येथें बंड उद्भवलें होतें व तेथील फौजांनीं आऱ्याकडे धांव घेतली होती. या परिस्थितींत कुंवरसिंहाला जें बोलावणें आलें त्याचा हेतु न समजण्याइतका तो गाफील नव्हता. कमिशनरचें बोलावणें म्हणजे यमराजाचेंच बोलावणें होतें! कुंवरनें हें जाणलें आणि मुत्सद्देगिरीचा निरोप पाठविला कीं, 'माफी असावी हुजूर. वृद्धापकाळामुळें प्रकृति क्षीण झाली आहे. येणें कठीण आहे!'

प्रकृति क्षीण झाली होती कुंवरसिंहाची; पण त्याचं अंतःकरण सूडानें व स्वातंत्र्याच्या आकांक्षेनें पेटलें होतें. इंग्रज आज ना उद्यां आपल्याला कैद करणार हें कुंवरसिंहानें जाणलें होतें. मग काय, आयुष्याचे अखेरचे दिवस असे कैदेंत घालवायचे? नाहीं! मरायचं तर आतां रजपुताच्या इभ्रतीला शोभेल अशा तऱ्हेनें मरेन! मरेन पण हटणार नाहीं! मोडेन पण वांकणार नाहीं! मी मेलों तर माझा धाकटा भाऊ अमरसिंह क्रांतीचा ध्वज हातीं घेईल. माझे सहकारी हरेकृष्णसिंह व रणदलसिंह माझ्या पाठीशीं आहेतच. तर मग अमरसिंहा, ऊठ; लढण्याचं तुझं वय नाहीं; पण

लाचार जीवन कंठण्यापेक्षां आहे त्या बळानिशीं स्वाभिमानानें लढणं श्रेयस्कर नाहीं का ?

उठला ! ऐशीं वर्षांचा वृद्ध अमरसिंह तलवार उपसून आऱ्याकडे निघाला. पाटण्याचे क्रांतिकारक तेथें गोळा झाले होते. त्यांनीं तुताऱ्या फुंकून व तलवारी उंचावून अमरसिंहाचा जयजयकार केला व त्याला सेनापति केलें. आरा येथें जे थोडे इंग्रज सैनिक होते त्यांनीं भीतीनें एका दुमजली इमारतीचा आश्रय घेतला. पांचपन्नास शिख त्यांच्या दिमतीला होते. या इंग्रजांचा समाचार घेण्यापूर्वीं क्रांतिकारकांनीं आऱ्याचा तुरूंग फोडला, खजिना लुटला व अन्नधान्य लुटलें. सरकारी कागदपत्र जेव्हां ते जाळायला निघाले तेव्हां कुंवरसिंह पुढें झाला व म्हणाला, 'अरे, कागदपत्रें जाळूं नका. उद्यां इंग्रज निघून गेल्यावर आपला कारभार सुरू होईल. तुम्ही कागदपत्रं जाळलींत तर आपापसांतील खटल्यांचे निकाल कशाच्या आधारावर लावणार ?' कुंवरचें हें म्हणणें सर्वांना पटलें. यानंतर क्रांतिसेना इंग्रजांच्या आश्रयस्थानाकडें वळली. उभयपक्षीं गोळीवार सुरू झाला. कित्येक दिवस इंग्रज वेढ्यांत अडकून पडले होते. त्यांचा पाण्याचा सांठा संपत आला. बाहेरून कुमक येण्याची ते वाट पहात होते. कुंवरसिंहाच्या हस्तकांनीं त्यांच्या आश्रयस्थानाभोंवतीं लांकडें रचून आग लावली; पण वारा उलट दिशेनें वाहूं लागल्यानें त्यांचा बचाव झाला. अखेर दानापूरहून मेजर डन्बर कवाइती सैन्य घेऊन आऱ्याकडे निघाला. कुंवरला ही बातमी कळतांच त्यानें आपलें सैन्य रात्रीं झाडींत लपवून ठेवलें. इंग्रज सैन्य आऱ्याजवळ येतांच कुंवरच्या सैन्यानें त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यांत डन्बर ठार झाला! इंग्रज मार खाऊन दानापूरला परतले. परतले ते जेमतेम पन्नासच. बाकी शेंकडों गोरा क्रांतिकारकांनीं कापून काढला !

आऱ्याच्या पराभवाची भीषण वार्ता समजतांच व्हिन्सेंट व आयर हे दोन सेनापति कुंवरच्या समाचाराला निघाले. त्यांच्याबरोबर उत्तम तोफखाना

होता. २ ऑगस्टला गजराजगंज येथें कुंवरच्या सैन्याशीं त्यांची गांठ पडली. पाऊस धो धो पडत होता तरी इंग्रजांच्या तोफांनीं जोराची मारागिरी केली. या मारागिरीमुळें कुंवरच्या सैन्याची फळी मोडली व त्याला मागें हटावें लागलें. हटतां हटतां कुंवरनें एक पूल तोडून टाकला. विविगंज येथें हातघाईची लढाई झाली. पण येथें पराभूत होऊन कुंवरसिंह जगदीशपुरांत आला. दरम्यान आयरनें आऱ्यांतील वेढ्यांत अडकलेल्या स्वबांधवांची मुक्तता केली. इंग्रज सैन्य आतां जगदीशपुराकडे वळलें. इंग्रजांनीं तेथें आपले हस्तक पेरून ठेवले होते. प्रत्यक्ष लढाईचे प्रसंगीं या हस्तकांचा इंग्रजाना चांगलाच उपयोग झाला. जगदीशपुरांत इंग्रज येण्यापूर्वीं वाटेंत तोळानारायणपूर व दुलौर येथें क्रांतिकारक सैन्याशीं त्यांना लढावें लागलें. अमरसिंह येथील लढायांत शौर्यानें लढला; पण इंग्रजांच्या तोफखान्यापुढें त्याची मात्रा चालली नाहीं. जगदीशपूर येथें थोडीशी चकमक उडून कुंवरसिंहाचा पराभव झाला व तो पळून गेला. जीव बचावण्यासाठीं मात्र नव्हे, तर डोंगर-झाडींतून गनिमी काव्यानें प्रतिकार करण्यासाठीं. ऑगस्ट ५७ च्या मध्यास जगदीशपूर इंग्रजांचे हातीं पडलें. या वेळीं हातीं सांपडलेल्या शेंकडों क्रांतिकारकांना झाडांवर फांशी देण्यांत आलें. नगराची लुटालुट झाली. कुंवरसिंहाच्या राजशाही वाड्याची नासधुस करण्यांत आली. जितौर येथील त्यांचा बंगला पाडण्यांत आला. त्याचें आवडतें शिवमंदिर—पण तेंहि उध्वस्त करून लुटण्यांत आलें. नंतर द्वाही फिरविली कीं, 'जो कोणी कुंवरसिंहाचें डोकें कापून आणून देईल त्याला २५ हजाराचें इनाम देण्यांत येईल.'

पण कुंवरसिंहाचें डोकें म्हणजे कांहीं कुंभारवाड्यांतील कच्चें मडकें नव्हतें किंवा आंबराईंतील एकादें आम्रफल नव्हतें कीं जो मनांत आणील त्याला तें सहज गवसावें. इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन कुंवरसिंह, अमरसिंह, रणदलसिंह व हरेकृष्णसिंह जे पळाले ते थेट ससरामच्या पहाडांत गेले.

ससराम व कैमूर येथील पहाडांत इंग्रजांना त्यांनीं जेरीला आणलें. ठिकठिकाणच्या पलटणींत त्यानीं असंतोष फैलावला व जवळजवळ सारा बिहार क्रांतियुद्धानें भारावून टाकला. इंग्रजांच्या पलटणी एकसारख्या कुंवरसिंहादि नेत्यांचा पाठलाग करूं लागल्या; पण ते बहादर कधीं आसामकडे, तर कधीं रामगड--देवगडकडे; कधीं रेवा संस्थानांत तर कधीं जबलपूरकडे, कधीं काल्पीकडे तर कधीं आझमगडकडे--अशा दूरवरच्या टापूंत गनिमी काव्यानें इंग्रजांना झुंजवीत होते. नोव्हेंबर ५७ ते मार्च ५८ अखेरपर्यंत कुंवरसिंह जवळजवळ भूमिगत होता. मार्चअखेरीस तो पुन्हां जय्यत तयारी करून समरांगणांत उतरला. अत्रौलिया येथें इंग्रजांनीं त्याला गांठलें. या वेळीं कुंवरसिंहाजवळची प्रचंड सेना पाहून कर्नल मिल्मन्‌नें माघार घेतली. इंग्रजांचा पाठलाग करून कुंवरनें त्यांची छावणीं ताब्यांत घेतली. पुढें इंग्रजांच्या हातून आझमगढहि त्यानें मिळविलें. यानंतर मात्र इंग्रजांना नवी व मोठ्या प्रमाणावर कुमक आली व कुंवरसिंहाचा पराभव होत गेला. जनरल लुगार्डनें आझमगढला वेढा दिला. १५ एप्रिल १८५८ रोजीं तमसा नदीवर उभयपक्षीं संग्राम झाला. कुंवरसिंह माघार घेऊन गंगापार होण्याच्या मार्गाला लागला. ब्रिगेडियर डग्लसनें त्याचा पाठलाग सुरू केला; पण कुंवरसिंह मोठ्या शिताफीनें शिवपूर येथें गंगापार झाला. डग्लसनें तोफांचा मारा केला; पण कुंवरनें केव्हांच पैलतीर गाठलें होतें. हत्तीवर बसून मोठ्या डौलानें तो गंगेच्या कांठानें चालला होता. दुर्दैवानें त्याचा तो त्या वेळचा डौल क्षणार्धांतच डळमळला. पलीकडे दबा धरून बसलेल्या इंग्रजांनीं चवताळून जाऊन तोफेला बत्ती दिली. तोफेचा गोळा नेमका कुंवरसिंहाच्या हाताला चाटून पुढें गेला. या गोळ्यानें शेजारींच उभा असलेला रणदलसिंह तत्काळ ठार झाला व कुंवरच्या डाव्या हाताला जखमा होऊन तो बेशुद्ध पडला. अनुयायांनीं वारा घालून त्याला सावध केलें; पण जखमांच्या वेदनांनीं कुंवरसिंहाचे प्राण कंठाशीं आले. अखेर उजव्या हातानें तलवार उपसून त्यानें डावा हातच छाटून गंगार्पण केला.

जखमी अवस्थेंत झुंकाज्या देऊन कुंवरसिंह पुन्हां जगदीशपुरांत आला. या वेळीं इंग्रजी सत्तेचा जगदीशपुरांत मागमूसहि नव्हता. आपल्या भग्न वाड्यांत प्रवेश करतांना कुंवरचें अंतःकरण भरून आलें. भाऊ भाऊ पुन्हां कडकडून भेटले. अमरसिंहानें कुंवरसिंहाला धीर दिला व पुढच्या प्रसंगास धैर्यानें तोंड देऊं असें आश्वासन दिलें. कुंवरसिंहानें जगदीशपुरांत प्रवेश केल्याचें कळतांच डग्लस व लुगार्ड मोठी फौज घेऊन निघाले. ली ग्रँटच्या फौजेला जगदीशपुराजवळ एका जंगलांत अडवून कुंवरच्या सैन्यानें त्याला चांगलाच इंगा दाखविला व शेंकडों इंग्रजांना ठार मारलें. उभय पक्षांत जयापजय चालू होते. हात निकामी झाल्यानें कुंवरसिंहानें अंथरूण धरलें होतें. त्याला हळूहळू ताप येऊं लागला. वृद्धापकाळामुळें शरीर खचत चाललें होतें. सेवकांकडून उपायांची शर्थ चालली होती; पण ती व्यर्थ जाऊन कुंवरसिंह जगदीशपूरच्या आपल्या आवडल्या वाड्यांत २६ मे १८५८ रोजीं निधन पावला! त्याला मरण आलें तें एक प्रकारें रणांतच नव्हे का?

कुंवरसिंहाच्या मरणानंतर इंग्रज फौजांनीं जगदीशपूर पुन्हां घेतलें. अमरसिंह बोलल्या शब्दाला जागून पुढें लढत राहिला. मेजर हॅवलॉक त्याच्या पाठीवर होता. २४।११।१८५८ रोजीं अमरसिंहाला हॅवलॉकनें एका खेड्यांत गांठलें; पण अमरसिंह उसाच्या मळ्यांत पळाला. पळतां पळतां पिस्तूल उडवून त्यानें दोघां इंग्रज घोडेस्वारांस ठार मारलें व एकाच्या घोड्यावर स्वार होऊन तो नेपाळकडे पसार झाला! अमरसिंहाचें पुढें काय झालें तें फक्त काळालाच ठाऊक! दोघेहि बंधु जिवाला जीव देऊन शेवटपर्यंत झुंजत राहिले ही केवढी अलौकिक व स्फूर्तिदायक गोष्ट! कुंवरसिंहा व अमरसिंहा, तुमचें बंधुप्रेम मोठें होतें कीं रणनैपुण्य मोठें होतें हें समजणें खरोखर कठीण आहे!

# नरगुंदकर भावे



१८५७ चें क्रांतियुद्ध हें मुख्यतः उत्तर भारतांत म्हणजे नर्मदेच्या पलीकडे लढलें गेलें. दक्षिण भारत हा त्या वेळीं जवळजवळ थंड होता असें म्हटलें तरी चालेल. या थंडपणाला अपवाद फक्त दक्षिण महाराष्ट्र होता. कोल्हापूरचे चिमासाहेब, सातारचे रंगो बापूजी व नरगुंदचे भास्कराव ऊर्फ बाबासाहेब भावे या तीन बहादरांनीं दक्षिण महाराष्ट्रांत क्रांतियुद्धाची ध्वजा फडकावून महाराष्ट्राची उज्ज्वल परंपरा राखली. या तिघांहि क्रांतिकारक नेत्यांची उत्तर भारतांतील कानपूर, लखनौ इत्यादि ठिकाणच्या क्रांतिकारकांशीं हातमिळवणी होती. दुर्दैव एवढेंच कीं, उत्तर भारताप्रमाणें दक्षिणेंतील ही चिमुकली क्रांतिही अयशस्वी झाली. चिमासाहेबांना कैद करून कराचीला डांबण्यांत आलें, रंगो बापूजी भूमिगत झाला तो पुन्हा कोणालाही दिसला नाहीं व नरगुंदकर इंग्रजांचे हातीं लागून फांशी गेले ! इंग्रज अधिकाऱ्याचा खून व इंग्रजी सत्तेविरुद्ध बंड या आरोपाखालीं

नरगुंदकरांना फांशी जावें लागलें. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं फांशी जाणारा पहिला मराठी संस्थानिक या दृष्टीनें नरगुंदकरांचें नांव गौरवास्पद आहे !

धारवाडच्या ईशान्येस सुमारें ३०—३२ मैलांवर नरगुंद नांवाचें छोटें शहर आहे. नरगुंद हें पूर्वीं एक छोटें संस्थान होतें; पण सत्तावनच्या क्रांति-युद्धांत या संस्थानची आहुति पडली व १८५८ सालीं तें खालसा झालें. संस्थानचे अधिपति श्रीमंत भास्करराव ऊर्फ बाबासाहेब १८४२ सालीं गादीवर आले. बाबासाहेबांच्या वयासंबंधीं निश्चित माहिती मिळत नाहीं. १८५७ च्या सुमारास त्यांचें वय त्रेपन्न वर्षांचें होतें असा उल्लेख 'करमणुकी' च्या एका अंकांत दिलेला आहे. बाबासाहेबांची तृतीय पत्नी सावित्रीबाई मोठी पतिनिष्ठ व निग्रही स्त्री होती. बाबासाहेब गादीवर आले त्याच वर्षीं सावित्रीबाईंना मुलगा झाला होता; पण हा चारपांच महिन्यांचा होऊन वारला. पुत्रनिधनामुळें उतार वयांत बाबासाहेबांना मोठा धक्का बसला. यानंतर पुत्रसंततीसाठीं अनेक व्रतवैकल्यें करण्यांत आलीं; पण पुत्र होण्याचें चिन्ह दिसेना. शेवटीं १८४७ सालीं बाबासाहेबांनी इंग्रज सरकारकडे दत्तकासाठीं अर्ज केला व अनेक पत्रें पाठवून आपली व्यथा व्यक्त केली. कोर्ट ऑफ डायरेक्टर्सना बाबासाहेबांची दत्तक-मागणी रास्त वाटत होती. म्हणून त्यासंबंधीं अभिप्राय मागविण्यासाठीं त्यांनीं तो अर्ज इनाम कमिशनकडे पाठविला. मॅन्सन नांवाचा अधिकारी त्या वेळीं इनाम-कमिशनचा अधिकारी होता. त्यानें बाबासाहेबांच्या अर्जाला वांटाण्याच्या अक्षता लावल्या ! इंग्रज सरकारनें या अभिप्रायानुसार बाबासाहेबांचा दत्तक-अर्ज नामंजूर केला व एक प्रकारें त्यांची वंशवेलच उपटून टाकली.

बाबासाहेब हे शूर, कर्तबगार, धाडसी व विद्वान् राज्यधुरीण होते. त्यांचा स्वभाव तापट व जिद्दी होता. एकदां मनांत आलें म्हणजे त्यासाठीं ते आकाशपातळ एक करीत. बाबासाहेबांच्या साहसी व जिद्दी स्वभावाच्या दोन आख्यायिका प्रसिद्ध आहेत. एकदां होळीपौर्णिमेच्या दिवशीं बाबा-

साहेब घोड्यावर वसून ग्रामदेवतेच्या दर्शनाला निघाले. जातां जातां वाटेंत एक होळी पेटलेली दिसली. होळीभोंवतीं जमलेल्या लोकांनीं वाबासाहेवांना रोखलें. लोकांनीं आग्रह केला कीं, ' होळी ओलांडून जाऊं नये. ' पण वाबासाहेवांना ही गोष्ट मान्य होईना. लोक जाऊं देईनात तेव्हां वाबासाहेवांनीं सरळ घोडाच होळीवरुन दौडला. भर ज्वाळांतून घोडा फेकण्याचें हें अजब कसव व साहस पाहून ज्वाळांनीं आपल्या माना टाकल्या ! लोकांनीहि तोंडांत वोटें घातलीं ! दुसरी आख्यायिका अशी—वावासाहेवांचे धाकटे बंधु रामदुर्गकर हे आपल्या गांवांतून मेण्यांत वसून जात असतांना कांहीं दंगेखोर लोकांनीं त्यांच्यावर धूळफेक केली व दगड मारले. हा प्रकार वहुधा धुळवडीच्या दिवशीचा असावा. वावासाहेवांच्या कानीं बंधूचा हा अपमान जातांच ते तडक उठले व रामदुर्गला निघाले. गावांत प्रवेश करण्यापूर्वीं त्यांनीं दवंडी पिटविली कीं 'मी नरगुंदकर येतों आहें. कुणाची हिंमत असेल तर त्यानें दगडफेक करून पहावी! जिकडून दगड येतील तो सारा भाग जाळून मगच पुढें जाईन !' वावासाहेवांच्या या आव्हानाला उत्तर देण्याची कुणालाच हिंमत झाली नाहीं.

इंग्रज सरकारनें दत्तकाची परवानगी नाकारतांच वावासाहेवांच्या उग्र मूर्तीनें रुद्रावतार धारण केला. त्यांनीं इंग्रजी सत्तेविरुद्ध दंड थोपटले. याच वेळीं उत्तरेंतून क्रांतिकारकांचे दूत दक्षिणेंत आले होते. त्यांच्याकडून बंडाच्या वार्ता सर्वत्र प्रसृत झाल्या होत्या. नानासाहेव, राणी लक्ष्मीवाई इत्यादींचे पराक्रम ऐकून वावासाहेवांस युद्धाची प्रेरणा झाली व त्यांनीं युद्धाची तयारी केली. दत्तक अर्ज-नामंजूर करणारा मॅन्सनसाहेब नुकताच दक्षिणी संस्थानांचा पोलिटिकल एजंट झाला होता. या मॅन्सनवरच वावासाहेव विशेष रुष्ट झाले होते.

दक्षिणी संस्थानांत वंडाच्या हालचाली चालू असल्याचा सुगावा लागतांच इंग्रजांची वक्रनजर प्रथम जमखिंडीच्या अप्पासाहेवांकडे वळली. कर्नल

मॅन्सन या वेळीं कोल्हापूरला होता. मॅन्सन तरुण व साहसी होता. मूळ धरूं लागलेलें वंड वेळींच मोडूं अशी त्याला ईर्षा होती. या ईर्षेच्या नशेंत तो कोल्हापूरहून २६ मे रोजीं नरगुंदकडे निघाला. यापूर्वी नरगुंदकरांना जमखिंडीला बोलवून त्यानें एकदां त्यांचा अपमान केला होता. मॅन्सन निघतो न निघतो तोंच २७ मे रोजीं नरगुंदकरांनीं वंड पुकारल्याची कोल्हापूरला वार्ता आली. कर्नल जेकवनें ही वार्ता मॅन्सनला कळविण्यासाठीं तांतडीनें घोडेस्वार पाठविला. मॅन्सननें नरगुंदला जाणें धोक्याचें होतें. कारण एक तर मॅन्सनबरोबर दहाबाराच शिपाई होते व दुसरी गोष्ट म्हणजे बेळगांवहून कुमक येईपर्यंत नरगुंदला जाणें आत्मघातक होतें. जेकवचा निरोप मॅन्सनला कुरुंदवाडला कळला; पण मॅन्सन हट्टाला पेटला. आपल्या कर्तृत्वावर त्याचा फाजील विश्वास होता. कर्नल मालकमला जादा कुमकेसाठीं निरोप पाठवून तो पुढें निघाला. रामदुर्गला पोंचतांच तेथील अधिपतींकडून म्हणजे बाबासाहेबांच्या बंधूकडून मॅन्सनला नरगुंदच्या वंडाची हकिकत समजली. रामदुर्गकरांनींहि नरगुंदला जाण्यांत धोका असल्याचा त्याला इशारा दिला; पण मॅन्सननें त्याकडे दुर्लक्ष केलें. विनाशकाले विपरीत बुद्धि हेंच खरें!

२९ मे रोजीं रात्रीं १० वाजतां सुरेबान गांवीं मारुतीच्या देवळाजवळ मॅन्सननें झाडाखालीं तळ दिला. मॅन्सन तंबूंत झोंपी गेला. त्याचे शिपाई बकरें कापून जेवणांत गुंग झाले. बाबासाहेबांची आपल्या सावजावर पाळत होतीच. मॅन्सनच्या मुक्कामाचा सुगावा लागतांच त्यांनीं पांच-सहाशें सैनिकांच्या मदतीनें मध्यरात्रीं तेथें अचानक छापा घातला. आरडाओरडीनें मॅन्सन जागा झाला. 'बदमाष' लोकांचा गराडा पाहून त्यानें पिस्तूल झाडलें. यामुळें दोन माणसें तत्काळ ठार झालीं; पण शेंकडों लोकांपुढें मॅन्सन करतो काय? जीव बचावण्यासाठीं तो देवळांत पळाला व दार लावून बसला; पण बाबासाहेबांच्या फौजबंदांनीं देवळावर चढून आंत उड्या

मारल्या व मॅन्सनचें शीर कापून तें धडावेगळें केलें. मॅन्सनबरोबर आलेल्या शिपायांची यापूर्वींच वाट लागली होती. हा प्रकार झाल्यानंतर मॅन्सनचें शरीर अग्नींत फेकण्यांत आलें व त्याचें शीर बरोबर घेऊन बाबासाहेब नरगुंदांत आले. नरगुंदांतील एका वेशीवर हें शीर टांगण्यांत आलें. कशासाठीं? तर विजयाचं तोरण म्हणून! इंग्रजी सत्ता नाहींशी झाल्याची निशाणी म्हणून!

दुर्दैवानें बाबासाहेबांचा हा विजय औटघटकेचा ठरला. मॅन्सनचा खून म्हणजे बाबासाहेबांचें शेवटचें साहस ठरलें! कित्येकांच्या मतें बाबासाहेबांचा मूळ विचार मॅन्सनला धरण्याचा होता; मारण्याचा नव्हता. बाबासाहेबांच्या अपरोक्ष फौजेनें उतावीळ होऊन हा 'ध' चा 'मा' केला! इंग्रजांच्या आदेशाप्रमाणें बाबासाहेबांनीं आपल्याजवळील सर्व शस्त्रास्त्रें व दारुगोळा स्वाधीन केलेला नव्हता. तेव्हां मॅन्सन नरगुंदला येतो आहे तो आपल्याला धरण्यासाठीं असेंच त्यांच्या मनानें घेतलें व मग त्यांनीं ही साहसी योजना आंखली. कसेंहि असो, बाबासाहेबांच्या नेतृत्वाखालीं मॅन्सनचा खून झाला ही गोष्ट खरीच! वस्तुत: हा खून नव्हे. बाबासाहेबांनीं बंड पुकारलें होतें, तें मॅन्सनला माहीत होतें व तरीहि मॅन्सन तोऱ्यानें नरगुंदाकडे निघाला होता. मध्यरात्रीच्या छाप्यांत चकमक उडाली तींत मॅन्सन एकाकी मारला गेला! याला युद्धशास्त्रांत खून म्हणतां येणार नाहीं.

मॅन्सनच्या खुनाची वार्ता बेळगांवला समजतांच १ जूनला कर्नल माल्कम अडीचशें सैन्य व तोफखाना घेऊन नरगुंदाकडे निघाला. इंग्रज सैन्य नरगुंदच्या परिसरांत पोंचतांच बाबासाहेबांची फौज त्याच्यावर चालून गेली; पण इंग्रजांच्या कवाईती व शस्त्रसंपन्न सैन्यापुढें त्यांचें कांहीं चालेना. माघार घेऊन त्यांनीं किल्ल्याचा आश्रय घेतला. नरगुंदचा हा महामत्तगड किल्ला बळकट होता; पण तोहि २ जूनला इंग्रजांनीं जिंकला. इंग्रजांनीं 'बंडखोरां' ची व शेंकडों नागरिकांची कत्तल केली. कित्येकांना तोफेच्या

तोंडीं दिलें. पाण्याची टांकी फोडण्यांत आली. लुटालूट झाली. श्रीवेंकटेशाच्या मूर्तीवरहि धाड पडली. पळापळ—सर्वत्र पळापळ—सुरू झाली. खुद्द बाबासाहेब वृध्द मातोश्रींच्या चरणाला स्पर्श करून व पत्नीचा निरोप घेऊन सहा विश्वासू लोकांबरोबर यात्रेकरूच्या वेषांत बाहेर पडले. इंग्रजांनीं फ्रँक सूटर या अधिकाऱ्याला त्यांना पकडण्याची आज्ञा दिली. २ जूनला रात्रीं तोरगलच्या डोंगरांत सूटरनें बाबासाहेबांना पकडलें. ११ जूनला बेळगांवीं चौकशी सुरू झाली. 'अटक होण्याच्या भीतीनें मीं बंड केलें' अशा अर्थाची बाबासाहेबांनीं जबानी दिली. १२ जून १८५८ रोजीं सैन्याच्या व शेंकडों नागरिकांच्या समक्ष बाबासाहेबांना बेळगांवला फांशी देण्यांत आलें! फांशीं देतांना एकदां दोरी तुटली; पण पुन्हां ती बांधण्यांत आली व बाबासाहेबांची मान तींत अडकाविण्यांत आली. बाबासाहेबांच्या फांशीमुळें, दक्षिण महाराष्ट्रांतील राज्यक्रांतीचा अंकुरच उपटला गेला!

बाबासाहेबांच्या मागें त्यांची पत्नी व वृद्ध आई प्रथम रामदुर्गकडे निघाल्या. त्या पायीं निघाल्या. कांट्याकुट्यांतून व उन्हातान्हांतून आश्रय शोधीत त्या वणवण फिरूं लागल्या. वाटेंत संगळगांवीं एका नातेवाइकाकडे त्यांनीं मुक्काम केला; पण घरच्या म्हातारीनें 'रांडांनो, आपलं घर बुडवून आतां आमच्या घरावर निखारे ठेवतां होयं!' असे विखार काढतांच स्वाभिमानी सावित्री सासूला घेऊन तडक घराबाहेर पडली. जवळच मलप्रभा वाहात होती. सावित्रीनें तिच्याच कुशीचा आश्रय घेण्याचा निर्धार केला. वृद्ध सासूला पाठीशीं बांधून २ जुलैला सावित्रीनें मलप्रभेच्या खोल डोहांत उडी घेतली. सास्वासुनांचीं प्रेतें हागनूरला सांपडलीं. म्हैसकर नांवाच्या महालकऱ्यानें पंचनामा करून त्यांना अग्निसंस्कार दिला. अशा रीतीनें भावे कुटुंबांतील या तीन्ही माणसांची एकाच कारणासाठीं क्रांतियज्ञांत आहुती पडली!



# तात्या टोपे

सत्तावनी क्रांतियुध्दांतील झुंजार सेनानी तात्या टोपे याच्या चरित्रांतील महत्त्वाचीं वर्षे तीन आहेत. क्रांतियुध्दांत तात्या प्रथम चमकतो तो कानपूरपर्वांत म्हणजे १८५७ च्या मे व जून महिन्यांत. कानपूर, विठूर, झांशी, काल्पी व ग्वाल्हेर येथील लढायांत त्याचा प्रामुख्यानें भाग होता. १८ जून १८५८ रोजीं ग्वाल्हेरच्या रणांत झांशीची राणी लक्ष्मीबाई निधन पावते व त्यानंतर तात्या स्वतःच्या हातीं लढाईचीं सूत्रें घेऊन प्रायः एकटाच इंग्रजांशीं झुंजत राहातो. ग्वाल्हेरच्या पराभवानंतर नऊ-साडेनऊ महिने तात्यानें पश्चिम हिंदुस्थानांत धुमाकूळ मांडला व इंग्रजी सत्ता खिळखिळी करण्याचा आटोकाट प्रयत्न केला; पण शेवटीं हा शूर एकांडा शिलेदार इंग्रजांच्या प्रचंड व सुसज्ज सामर्थ्यामुळें टेकीला आला व मानसिंगाच्या विश्वासघातामुळें त्यांच्या हातीं लागून १८ एप्रिल १८५९ रोजीं शिप्री ऊर्फ शिवपुरी येथें फांशी गेला! उण्यापुऱ्या तीन वर्षांच्या कालावधींत

तात्यानें एवढी चिकाटी, निष्ठा, शौर्य व बाणेदारपणा दाखविला कीं, प्रत्यक्ष शत्रूला म्हणजे इंग्रजांनाहि त्याच्या गुणांची व कर्तृत्वाची वाखाणणी करावी लागली. 'शिवरायांच्या परंपरेंत कसलेला हाच तो शेवटला झुंजार मराठा वीर!' असें सावरकरांनीं तात्याचें वर्णन केलें आहे आणि तें अगदीं सार्थ आहे. आयुष्यांतील शेवटचीं तीन वर्षें तात्यानें अशा उज्ज्वल मार्गानें व उदात्त कार्यासाठीं घालविलीं कीं, त्यामुळें त्याची कीर्ति अमर झाली आहे. निराशेच्या कोणत्याहि परिस्थितींत तात्याचें चरित्र स्फूर्ति देईल यांत शंका नाहीं.

१८५७ च्या क्रांतियुद्धापूर्वीं तात्याचें नांव इतिहासांत फारसें कोठें नमूद नाहीं. त्याच्या व्यक्तिगत आयुष्यासंबंधीं निश्चित माहिती थोडी मिळते. तात्याचें जन्मवर्ष, जन्मस्थान, आईवडील, भावंडें, मुलें, देहयष्टी, पोषाख इत्यादि बाबींसंबंधीं विविध मतें उपलब्ध आहेत. त्यांतून निश्चित अनुमानें काढणें कठीण झालें आहे. तथापि या सर्व मतांच्या आधारें तात्याचा सुसंगत व सविस्तर जीवनपट तयार करणें शक्य आहे.

रघुनाथराव ऊर्फ अण्णासाहेब विंचूरकर यांच्या 'तीर्थयात्रा–प्रबंधां'त तात्या टोपेचा नी त्याचे वडील अण्णा टोपे यांचा उल्लेख आढळतो. विंचूरकरांच्या 'प्रबंधां'तील वृत्तांत १८५० च्या सुमाराचा बिठूर ऊर्फ ब्रह्मावर्त येथील आहे. या वृत्तांतांत पिराजी राजे, तात्या टोपे, बाबा भट, नारायण मराठे यांचा नानासाहेबांशीं स्नेह असल्याचें नमूद आहे. तथापि स्नेह असला तरी नानासाहेब व तात्या समवयस्क नव्हते. नानासाहेबापेक्षां तात्या सुमारें दहा वर्षांनीं तरी मोठा होता. अण्णा टोपे नी चिरंजीव तात्या यांचें व विंचूरकरांचें 'हमेषा' येणेंजाणें होत असे. विंचूरकरांच्या हकीकतीवरून अण्णा टोपे मूळचे येवल्याचे व विंचूरकरांचेच आश्रित होते. गोदातीरीं कान्हेगांव येथील नरहरीची पूजा टोप्यांकडे होती; पण टोपे हे खरोखरीच मूळचे येवल्याचे होते का? बिठूरला बाजीरावाबरोबर

येण्यापूर्वीं ते येवल्याचे असतील; पण त्यांचें मूळ गांव कोणतें? तात्या टोपेनें फांशी जाण्यापूर्वीं जी विस्तृत जबानी दिली तींत त्यानें आपल्या गांवचा व वयाचा उल्लेख केलेला आहे. तोच खरा गृहीत धरला पाहिजे. जबानींत तात्यानें आरंभींच लिहिलें आहे कीं, 'माझें नांव तात्या टोपे. वडिलांचें पांडुरंगपंत. मूळ गांव तोला, परगणा पाटोदा, जिल्हा नगर. मी विठूरचा रहिवासी. माझें वय अंदाजें पंचेचाळीस असून मी नानासाहेबांच्या खाजगी नोकरींत आहें!'

पांडुरंगपंत ऊर्फ अण्णा हे तात्याचे वडील. फाशीचे वेळीं तात्या सुमारें पंचेचाळीस वर्षांचा होता याचा अर्थ त्याचा जन्म १८१४ च्या सुमाराचा होता हें स्पष्ट होतें. तात्याचें वय निरनिराळ्या पुस्तकांत ४० पासून ५० पर्यंत नमूद आहे; पण तात्याच्या जबानीसारखा विश्वसनीय पुरावा उपलब्ध असल्यानें आतां १८१४ हेंच त्याचें जन्मवर्ष मानलें पाहिजे. तात्याच्या जन्मस्थानाविषयींचा उल्लेख फक्त कै. डॉ. सावरकरांच्या पुस्तकांत आहे. 'तात्या टोपे यांचा जन्म इ. स. १८१४ या वर्षी येवलें या गांवीं झाला' असा तो उल्लेख आहे. तात्याचा जन्म येवल्याचा असणें अगदीं शक्य आहे. कारण पांडुरंगपंत पुण्याला बाजीरावाच्या पदरीं येण्यापूर्वीं येवल्यास होते. बाजीरावाचा कारभारी त्रिंबकजी डेंगळे व पांडुरंगपंत यांची ओळख होती. त्रिंबकजी हा संगमनेर तालुक्यांतील निंबगांवजाळीचा रहिवासी. संगमनेर नी येवलें या गांवांतील अंतर फारसें नसल्यानें उभयतांची ओळख असणें शक्य आहे. त्रिंबकजीला बाजीरावाच्या पदरीं चांगले दिवस आल्यामुळें त्याच्याच मध्यस्थीनें पांडुरंगपंताचा पुण्यांत बाजीरावाच्या पदरीं प्रवेश झाला.

तात्याच्या 'टोपे' या आडनांवासंबंधीं कै. डॉ. सावरकरांनीं जी एक आख्यायिका दिलेली आहे तिची थोडी छाननी केली पाहिजे. 'बाजीराव पेशवे यांनीं तात्यांचें बुद्धिचापल्य, त्यांची तरतरी व शिपाईबाणा हे सद्-

गुण पाहून एकदां त्यांस एक भरदार टोपी संतुष्ट होऊन पारितोषिक म्हणून दिली. टोपीस एकंदर नऊ रत्नें लाविलीं होतीं. ज्या दिवशीं बाजीरावांनीं ही टोपी तात्यास अर्पण केली, त्या दिवसापासून श्रीमंत त्यास येवलेकर म्हणण्याच्या जागीं टोपे म्हणून म्हणूं लागले.' अशी ती आख्यायिका आहे. तीर्थयात्रा–प्रबंधांत १८५० सालची हकिकत देतांना विंचूरकरांनीं तात्याच्या वडिलांचा म्हणजे पांडुरंगपंतांचा उल्लेख 'अण्णा टोपे' असा केलेला आहे. याचा अर्थ तात्याच्या पूर्वीपासून 'टोपे' हें आडनांव प्रचलित असलें पाहिजे. तात्याचे शिपाईबाणा इत्यादि सद्गुण १८५० च्या अखेरपर्यंत बाजीरावाला केव्हां दिसले? दिसणेंच शक्य नाहीं! तात्याच्या छायाचित्रांत जी टोपी दिसते तिजवर रत्नें दिसत नाहींत. दिसतात तीं नवांपेक्षां अधिक आहेत. याशिवाय तात्यासारखी टोपी त्या काळीं अनेक मातबर मंडळी घालीत असावीत असें दिसतें. कॅसलसच्या इंडियन हिस्टरींत नेपाळच्या जंगबहादुराचें एक छायाचित्र दिलें आहे. तें छायाचित्र व त्यांतील टोपी पाहिली कीं तात्याचाच भास होतो इतकें दोन्हींत साम्य आहे. सारांश, येवलेकरांचे 'टोपे' झाले ही आख्यायिका बरोबर वाटत नाहीं. येवलेकर टोपे असें म्हणणें फारतर सयुक्तिक दिसेल. तात्या टोपे हा देशस्थ ब्राह्मण होता. त्याचे वडील वेदशास्त्रसंपन्न असून बाजीरावाच्या धर्मादायखात्यांत त्यांची नेमणूक होती. १८१८ सालीं पेशवाईचा अस्त झाल्यावर दुसरा बाजीराव कानपूरजवळील बिठूर येथें वास्तव्यासाठीं गेला. त्याच्याबरोबर जीं अनेक कुटुंबें आश्रित म्हणून गेलीं त्यांतच पांडुरंगपंत होते. वडिलांबरोबर तात्याहि बिठूरला आला.

पांडुरंगपंतांना एकूण आठ मुलें होतीं. रघुनाथ तात्या हें त्यांचें दुसरें अपत्य तात्याचे कांहीं बंधू सावत्र असल्याचे उल्लेख आढळतात. यावरून पांडुरंगपंतांना दोन भार्या होत्या हें स्पष्ट होतें. त्यांची हीं दोन लग्नें केव्हां झालीं व त्यांच्या भार्यांचीं नांवें काय ही माहिती मिळूं शकत नाहीं. खुद्द

तात्याचें लग्न केव्हां झालें व त्याच्या पत्नीचें नांव काय हीहि माहिती उपलब्ध नाहीं. तात्याचे आईवडील तो फांशी जाईपर्यंत हयात होते. झांशीच्या पराभवानंतर तात्या व राणी लक्ष्मीबाई काल्पी येथें एकत्र झालीं व त्यांनीं कुंच येथें इंग्रजांशीं पुन्हां लढाई दिली. येथील पराभवानंतर जलोनजवळील चुरकी येथें तात्या आपल्या आईवडिलांना एकदां भेटून आला. यानंतर मात्र आईवडिलांशीं वा इतर कुटुंबियांशीं त्याची भेट झालेली दिसत नाहीं. तात्याला सखाराम नांवाचा मुलगा व मनोरमा नांवाची मुलगी अशीं दोनच अपत्यें होतीं. मुलीचा विवाह सडशिंगे नांवाच्या गृहस्थाशीं झाला होता व तिला १८५८च्या सुमारास काल्पी येथें मुलगा झाला होता. त्याचें नांव गोविंद. तात्याचा मुलगा नानासाहेबांच्या मंडळीबरोबर नेपाळांत गेला. वडील पांडुरंगपंत १८६२ च्या सुमारास काशी येथें निधन पावले. निधनापूर्वीं त्यांनीं संन्यास घेतला होता. वडिलांवर तात्याची फार भक्ति होती. फांशी जाण्यापूर्वीं इंग्रजांना त्यानें विनंति केली होती कीं, 'माझ्या वृद्ध पित्याचा माझ्या कृत्याशीं कांहीं संबंध नाहीं. सबब त्यांना त्रास देऊं नका!'

तात्या मध्यम उंचीचा, निमगोरा व शरीरानें चांगला धट्टाकट्टा होता. त्याचा चेहरा भव्य असून कपाळ उंच व नाक सरळ होतें. डोळे काळेभोर असून भुवया कमानदार होत्या. तात्याची नजर भेदक होती. त्याच्या चेहऱ्यावर बुद्धिमत्तेचें पाणी विलसत होते व त्या चेहऱ्याकडे पाहिलें म्हणजे हा मोठा कर्तबगार माणूस आहे असें वाटे. तात्याला लिहितां-वाचतां येत होतें. इंग्रजी केवळ सहीपुरतें येत होतें. फांशी जाण्यापूर्वीं दिलेल्या जबानीच्या खालीं त्यानें Tatia Tope अशी इंग्रजींतच सही केली. जबानींत 'मी नानासाहेबांचा नोकर, त्यांच्या आज्ञेनें सर्व कांहीं केलें. कानपूरच्या कत्तलींत माझा संबंध नव्हता' अशी भूमिका त्यानें मांडली होती. उर्दू, हिंदुस्थानी, संस्कृत भाषा त्याला चांगल्या अवगत होत्या. खटल्याच्या प्रसंगीं तो

सावकाश व मोजकेंच बोलत असे. अधिकाऱ्यांनीं विशेष छेडलें म्हणजे तो 'माहूम नहीं' एवढेंच ठासून सांगे. तात्याला दाढीमिशा व कल्ले होते अशी माहिती अनेक इंग्रज-ग्रंथकारांनीं दिली आहे. तात्याचीं जीं कांहीं दोन-तीन छायाचित्रें उपलब्ध आहेत त्यांत दाढीमिशा असणारें एकहि नाहीं. धावपळीच्या अखेरच्या दिवसांत त्याची दाढी वाढलेली असणें शक्य आहे. करड्या रंगाच्या दाढीमिशा होत्या अशीहि माहिती मिळते. तात्या रणपंडित होता ही गोष्ट स्पष्टच आहे. मात्र त्याचें हें रणपांडित्य गनिमी काव्याच्या युद्धतंत्रापुरतेंच मर्यादित होतें. समोरासमोरील लढ्यांच्या प्रसंगांत तात्या अपयशी झालेला होता. साधनसामग्रीचा अभाव हें या अपयशाचें कारण होतें. तात्या नेहमीं घोड्यावर आरूढ होऊन लढाया देत असे. कचित् दमला भागला किंवा जखमी झाला तर तो पालखीचा आश्रय करी. त्याचा पोषाख साधा असे. खांद्यावर कधीं कधीं काश्मिरी शाल असे व जवळ नेहमीं तलवार व कुकरी असे. कैद झाला त्या वेळीं त्याचेजवळ तलवार, कुकरी व ११८ मोहरा असलेली थैली होती. १८ एप्रिल १८५९ रोजीं संध्याकाळीं फांशी जाण्याचे वेळीं तात्याची मुद्रा शांत होती. या प्रसंगीं त्यानें कोणतीहि हालचाल केली नाहीं. मरणाला तो जणु अधीर झाला होता. मानेभोंवतालचा दोर आंवळला जातांच दोनतीन मिनिटांतच त्याचा प्राण निघून गेला ! यानंतर त्याचा मृत देह घटकाभर लोंबकळत ठेवला होता. अनेक इंग्रज शिपाई त्या मृत देहाला डोळे भरून पहात होते. कित्येकांनीं तात्याच्या केसांचे झुपके कापून आठवणीसाठीं बरोबर नेले असें म्हणतात.

तात्याच्या फांशीनंतर क्रांतियुद्धाचा वणवा विझून गेला व इंग्रज राज्यकर्त्यांना स्वस्थता लाभली. 'चेसन अँड वुड हॉलस् मिसलेनी' नांवाच्या नियतकालिकांत १८६० सालीं एका इंग्रज लेखकानें तात्यासंबंधीं 'शेवटचा पेंढारी' या मथळ्याखालीं दोन लेख लिहिले होते. या लेखांतील पुढील मजकूर वाचला म्हणजे तात्याच्या योग्यतेची यथार्थ कल्पना येईल.

'बंडाच्या वेळीं नानासाहेबानें तात्याला सैन्याधिकारी नेमलें. कानपूरला झालेल्या इंग्रज स्त्रीपुरुषांच्या कत्तलीचे वेळीं तात्या हजर होता. झांशी येथील पराभवानंतर तो काल्पीकडे वळला. इंग्रजांना एकसारखें युद्धांत गुंतवून ठेवायचें असा त्यानें विडा उचलला. काल्पीवर चढाई करण्यापूर्वी सर ह्यू रोजला कुंच येथें तात्याशीं लढाई द्यावी लागली. तात्याच्या घोडदळानें आमच्यावर हल्ला केला व तें जिवावर उदार होऊन लढलें; पण पराभव होऊन तात्याला काल्पींत माघार घ्यावी लागली. खुद्द काल्पीहि तात्यानें अटीतटीनें लढविली. तलवार उपसून तो सैन्याला उत्तेजन देत होता व आमच्या तोफखान्यावर मारा करीत होता. काल्पीच्या पराभवानंतर तात्या व राणी लक्ष्मीबाई यांनीं ग्वाल्हेरवर हल्ला केला व तें जिंकलें. ग्वाल्हेरवर १६ दिवस तात्याचें राज्य होतें. ग्वाल्हेर इंग्रजांनीं जिंकल्यानंतर तात्या जयपूरकडे वळला व त्यानंतर जवळजवळ नऊ महिने पश्चिम भारतांत त्यानें ठिकठिकाणीं इंग्रजांना सतावून सोडलें! नर्मदा ओलांडून दक्षिणेकडे जाण्याचा त्याचा धाडसी बेत होता; पण तो साध्य झाला नाहीं. तात्याच्या हालचाली विद्युत्वेगानें होत. इंग्रजांवर तो अचानक छापे घाली व समोरासमोर लढण्याचा प्रसंग आला कीं, पहातां पहातां नाहींसा होई. त्याची चिकाटी दांडगी व ध्येयनिष्ठा प्रखर होती. त्याचें सैन्य त्याच्याइतकें उत्साही नसल्यानें तें हळूहळू त्याला सोडून जाऊं लागलें. तथापि तो बहाद्दर झुंजतच राहिला! मानसिंगानें विश्वासघात करून त्याला जर पकडून दिलें नसतें तर आणखी किती वर्षें इंग्रजांना त्याचा उपसर्ग पोंचला असता कोणास ठाऊक! विजयाच्या सर्व आशा मावळल्यानें तात्या सिरोंजच्या जंगलांत मानसिंगाच्या आश्रयानें दडून बसला होता. मानसिंगानें ७ एप्रिलला त्याला पकडून दिलें व मेजर मीडच्या स्वाधीन केलें! शेवटपर्यंत त्यानें दयेची याचना केली नाहीं. आमच्या नऊ पलटणी त्याच्या पाठीवर होत्या; पण सरळ मार्गानें तो कोणाच्याच हातीं लागला नाहीं

कैचींत सांपडला तरी त्याचें मनोधैर्य कायम असे. पळापळींत जखमी लोकांना त्यानें अंतर दिलें नाहीं. हिंदुस्थानांतील फ्रान्सएवढ्या प्रदेशांत तात्यानें बंडाळी माजविली होती. त्याच्या फांशी जाण्यानें पश्चिम हिंदुस्थानातील बंडाचा कणाच मोडला!'

तात्याच्या वीरमरणावर वीर सावरकरांनीं जें भाष्य केलें आहे तें तर पाठ करावें इतक्या मोलाचें आहे—'हा पेशव्यांचा राजनिष्ठ सेवक, १८५७ चा हा वीर योद्धा, स्वदेशाचा हुतात्मा, धर्माचा त्राता, मानी, प्रेमळ नि उदार तात्या टोपे, इंग्लिशांच्या फांसावर निष्प्राण स्थितींत लोंबकळत असलेला दिसला. फांशीचे खांब रक्ताने थबथबले नि स्वदेश अश्रूंनीं थबथबला. त्याचा एकच एक दोष म्हणजे, स्वदेशाच्या स्वातंत्र्याकरितां त्याने अमर्याद हाल अपेष्टा सोसल्या! विश्वासघातक्याचा दुटप्पी नीचपणा हेंच पारितोषिक त्याला मिळालें! आणि शेवटीं—इंग्लिशांच्या फांसावर त्याला एखाद्या चोर गळेकापूप्रमाणे लटकावण्यांत आलें. तात्या! तात्या! असल्या या हतभागी राष्ट्रांत तू आधी जन्मच का घेतलास? या विश्वासघातकी, नीच नि महामूर्ख लोकांकरितां तू आधी लढलासच का? तात्या, आमच्या डोळ्यातून घळघळत असलेले हे अश्रू तुला दिसत नाहीत का रे? रक्ताची भरपाई या दुबळ्या अश्रूंनी!– काय सौदा खरोखर!'

• • •

# सत्तावनविषयक कालपट

[ प्रस्तुत कालपटांत १८५७ च्या क्रांतियुद्धांतील महत्त्वाच्या घटनांची नोंद आहे; याशिवाय सत्तावनच्या क्रांतीशीं निगडींत असणाऱ्या पूर्वींच्या व तदनंतरच्या महत्त्वाच्या घटनांचीहि नोंद दिलेली आहे. यामुळें सत्तावनी क्रांतीयुद्धाचें समग्र व व्यापक चित्र सहजगत्या डोळ्यांपुढें उभें राहील. ]

## सत्तावन पूर्वी

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | जून | १७५७ | प्लासीची लढाई, सत्तावनच्या क्रांतिकारकांना प्रेरक झालेली. |
| १४। | १० | ।१८४७ | सातारच्या प्रतापसिंहाचें काशीला निधन. |
| १२ | जानेवारी | १८४८ | लॉर्ड डलहौसी कामावर रुजू. |
| ५ | एप्रिल | १८४८ | सातारच्या शहाजीचें निधन. |
| १९ | मार्च | १८४९ | पंजाब खालसा. |
| १ | मे | १८४९ | सातारचें राज्य खालसा. |
| २८ | जानेवारी | १८५१ | दुसऱ्या बाजीरावाचे निधन. |
| ३० | मार्च | १८५३ | वऱ्हाड खालसा. |
| —— | —— | १८५३ | खैरपूर ( सिंध ) खालसा. |
| २० | नोव्हेंबर | १८५३ | झांशीचे अधिपति गंगाधरराव दत्तक घेतात. |
| २१ | नोव्हेंबर | १८५३ | गंगाधररावांचें निधन. |
| ११ | डिसेंबर | १८५३ | नागपूरच्या रघोजींचें निधन. |
| २६ | जानेवारी | १८५४ | नागपूरचें राज्य खालसा. |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ... वि. ...
क्रमांक ... नों. दि. ...


| | | | |
|---|---|---|---|
| — | फेब्रुवारी | १८५४ | रंगो बापूजींचे हिंदुस्थानांत आगमन. |
| २ | ऑगस्ट | १८५४ | झांशी संस्थान खालसा. |
| — | ऑक्टोबर | १८५५ | अर्काट व तंजावर खालसा. |
| — | — | १८५६ | विधवा-विवाह व धर्मांतर-वारसा हक्कांचे कायदे. |
| ४ | फेब्रुवारी | १८५६ | अयोध्या खालसा. |
| ७ | फेब्रुवारी | १८५६ | अयोध्येचा नवाब पदच्युत. |
| २९ | फेब्रुवारी | १८५६ | डलहौसी निवृत्त व कॅनिंग रुजू. |
| ६ | मार्च | १८५६ | डलहौशीचें मायदेशीं गमन. |
| — | मार्च | १८५६ | क्रिमियन युद्ध. |
| — | नोव्हेंबर | १८५६ | इराणचें युद्ध. |

## आठराशेंसत्तावन

| | | |
|---|---|---|
| १९ | फेब्रुवारी | बरहामपूर येथें १९ व्या पलटणीचा दंगा. |
| २९ | मार्च | बराकपूर येथें मंगळ पांडेची उठावणी. |
| ६ | एप्रिल | मंगळ पांडेला फांशीची शिक्षा फर्मावली. |
| ८ | एप्रिल | मंगल पांडेचें हौतात्म्य. |
| १० | मे | मीरत येथें क्रांतियुद्धाची सुरुवात. |
| ११ | मे | क्रांतिकारकांचें दिल्लींत आगमन. |
| १२ | मे | क्रांतिकारकांनीं दिल्ली जिंकली. |
| २२ | मे | नानासाहेब पेशवे कानपुरांत दाखल. |
| २३ | मे | बनारस—अलाहाबाद येथे उठावणी. |
| ३० | मे | लखनौ पेटलें. |
| ३१ | मे | बरेलींत क्षोभ. |
| ४ | जून | झांशीच्या फौजांची उठावणी. |

| | |
|---|---|
| ४ ते १४ जून | अयोध्या-रोहिलखंड येथें क्रांतीचा फैलाव. |
| ५ जून | कानपूरच्या फौजेची उठावणी. |
| ७ जून | इंग्रज फौज—दिल्लींत दाखल. |
| १२ जून | काल्पीवर क्रांतिकारकांचा विजय. |
| १४ जून | ग्वाल्हेरच्या फौजा बिथरल्या. |
| २० जून | रंगो बापूजीच्या मुलास कैद. |
| २७ जून | कानपूरच्या घाटावर इंग्रजांची कत्तल. |
| १ जुलै | बिठूर येथें नानासाहेबास राज्याभिषेक. |
| ३ जुलै | पाटणा येथील पलटणी उठल्या. |
| ४ जुलै | लखनौला हेन्‍री लॉरेन्सचा मृत्यु. |
| ५ जुलै | रंगो बापूजी कायमचा फरारी. |
| १६ जुलै | कानपूरच्या 'बिबिघरां'तील इंग्रजांची कत्तल |
| १७ जुलै | कानपूर इंग्रजांनीं जिंकलें. |
| १७ जुलै | हैद्राबाद येथें बंडाळी. |
| १८ जुलै | नानासाहेब बिठूर सोडतात. |
| २७ जुलै | तात्या टोपेनें कानपूर पुन्हा जिंकलें. |
| २७ जुलै | आरा (बिहार) येथें कुंवरसिंहाची उठावणी |
| ३० जुलै | लाहोर येथें धामधूम. |
| ३१ जुलै | कोल्हापूर येथें २७ वी पलटण उठली. |
| १ ऑगस्ट | पंजाबांत उजनाला येथें क्रांतिकारकांची कत्तल. |
| १९ सप्टेंबर | सर ह्यू रोजचें हिंदुस्थानांत आगमन. |
| २० सप्टेंबर | दिल्ली पडली, बहादुरशहास अटक. |
| २१ सप्टेंबर | बहादुरशहाच्या पुत्रपौत्रांचे हॉडसनकडून खून. |
| २४ नोव्हेंबर | जनरल हॅवलॉकचा मृत्यु. |

| | | |
|---|---|---|
| ६ | डिसेंबर | कोल्हापुरांत पुन्हां बंडाळी. |

## अठराशेंअठ्ठावन

| | | |
|---|---|---|
| ६ | जानेवारी | नेपाळचा जंगबहादूर इंग्रजांना मिळतो. |
| २७ | जानेवारी | बहादूरशहाच्या चौकशीस प्रारंभ. |
| ४ | मार्च | अयोध्येचा पाडाव. |
| १२ | मार्च | लखनौच्या लढाईत हॉडसनचा मृत्यु. |
| १४ | मार्च | लखनौ इंग्रजांचे हातीं. |
| २० | मार्च | सर ह्यू रोजचें झाशींत आगमन. |
| २२ | मार्च | आप्पासाहेब जमखिंडीकर यांना कैद. |
| २३ | मार्च | झांशीस इंग्रजांचा वेढा. |
| २५ | मार्च | नानासाहेबांचें बरेलींत आगमन. |
| ३० | मार्च | तात्या टोपे झाशीला येतो. |
| ४ | एप्रिल | झाशीतून लक्ष्मीबाईचें निर्गमन. |
| ५ | एप्रिल | झाशी इंग्रजांचे हातीं. |
| २४ | मे | काल्पी इंग्रजांनीं घेतली. |
| २६ | मे | जगदीशपूर येथें कुंवरसिंहाचा मृत्यु. |
| २७ | मे | नरगुंदला उठावणी. |
| २९ | मे | मॅन्सनचा वध. |
| ३१ | मे | ग्वाल्हेरवर तात्या टोपे व राणी लक्ष्मीबाईचा हल्ला. |
| ३ | जून | ग्वाल्हेर येथे क्रांतिकारकांचा विजयोत्सव |
| ३ | जून | बाबासाहेब नरगुंदकरांस अटक. |
| १२ | जून | नरगुंदकरांना बेळगांवला फांशी. |
| १८ | जून | ग्वाल्हेरचा संग्राम व राणी लक्ष्मीबाईचा मृत्यु. |

| | | |
|---|---|---|
| २० | जून | ग्वाल्हेर इंग्रजांचे हातीं. |
| २ | ऑगस्ट | ईस्ट इंडिया कंपनीचें राज्य बरखास्त. |
| १ | नोव्हेंबर | अलाहाबाद येथें व्हिक्टोरिया राणीचा जाहीरनामा. |
| २४ | नोव्हेंबर | अमरसिंहाची शेवटची लढाई. |

## अठराशेंएकोणसाठ

| | | |
|---|---|---|
| ७ | एप्रिल | सिरोंज जंगलांत तात्या टोपेस अटक. |
| १० | एप्रिल | मुशरेरी छावणींत तात्याची जबानी. |
| १८ | एप्रिल | तात्या टोपेस शिप्री (शिवपुरी) येथें फांशी |
| — | ऑक्टोबर | नानासाहेब पेशव्यांचा नेपाळांत मृत्यु. |
| ९ | डिसेंबर | बहादूरशहा रंगूनला रवाना. |

## इतिश्री

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | डिसेंबर | १८६० | डलहौसीचें निधन. |
| १२ | मार्च | १८६२ | कॅनिंग स्वदेशीं. |
| १६ | जून | १८६२ | कॅनिंगचा मृत्यु. |
| २० | ऑगस्ट | १८६२ | रावसाहेब पेशवे कानपूरला फांशी. |
| ४ | नोव्हेंबर | १८६२ | बहादूरहशाचा ब्रह्मदेशांत अंत. |
| — | — | १८६९ | कोल्हापूरच्या चिमासाहेबांचें कराचींत निधन. |
| २० | जून | १८८७ | ग्वाल्हेरच्या जयाजीरावांचे निधन. |
| २१ | जून | १८८७ | अयोध्येच्या नवाबाचा मृत्यु. |
| २ | जानेवारी | १८९६ | ग्वाल्हेरचे दिवाण दिनकरराव राजवाडे यांचें निधन. |

... ग्रंथ संग्रहालय, ठाणें. ...
अनुक्रम ............ विः ............
क्रमांक ............ नोंः दिः ............

REFBK-0009479